जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## बनावट 'चंदन रत्न' पदवी दाखवून डॉक्टरची ११.२४ लाखांची फसवणूक

नगर – महाराष्ट्र कृषी खात्याची बनावट 'चंदन रत्न' आणि 'ड्रॅगन फ्रूट रत्न' पदवी धारण केल्याचे भासवून एका डॉक्टरची ११ लाख २४ हजार ५०० रुपयांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात कोपरगाव तालुक्यातील संवत्सर येथील संशयित आरोपी तेजस सतिष शेटे याच्याविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

खंडाळा येथील वैद्यकीय व्यावसायिक नागेश मारुती मेंगडे यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे. आरोपी तेजस शेटे याने फिर्यादीचा विश्वास संपादन करण्यासाठी आपल्याला कृषी खात्याकडून विशेष पदवी मिळाल्याचे खोटे सांगितले. त्याने एका ब्लॉगद्वारे कृषी खात्याची बनावट माहिती दाखवून ठराविक जातीच्या चंदनाची लागवड केल्यास मोठे उत्पन्न मिळते आणि त्यास शासन मान्यतेचे प्रमाणपत्र मिळेल, असे आमिष दाखवले. या खोट्या आश्वासनांना बळी पडून मेंगडे यांनी चंदनाच्या रोपांसाठी वेळोवेळी ११ लाख २४ हजार ५०० रुपये आरोपी शेटे याला दिले. मात्र, त्याने चंदनाची रोपे दिली नाही तसेच पैसेही परत देण्यास टाळाटाळ केली. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर डॉ.मेंगडे यांनी पोलिस ठाण्यात धाव घेतली. माहिती अधिकारात माहिती मिळवण्यास विलंब झाल्याने ही फिर्याद उशिरा दाखल झाली आहे. पोलिसांनी आरोपी शेटे याच्या विरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक जयेश गांगुर्डे करत आहेत.

## केंद्र स्तरावर एकमेव पद असतानाही अशैक्षणिक 'बीएलओं'ना कामाचे आदेश, मनपा शिक्षण विभागाचे अक्षम्य दुर्लक्ष; दिव्यांग विद्यार्थी शिक्षणापासून वंचित!

### सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांसह 'दिव्यांग कायदा २०१६' चे सरळ उल्लंघन

नगर – अहिल्यानगर महानगरपालिका शिक्षण विभागाच्या गलथान कारभारामुळे शहरातील दिव्यांग विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य अंधारात सापडले आहे. वार्षिक परीक्षेचा अत्यंत महत्त्वाचा काळ असतानाही, केंद्रावरील एकमेव असलेल्या केंद्रस्तर विशेष शिक्षकांना 'बीएलओ' म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. हा प्रकार केवळ विद्यार्थ्यांचे नुकसान करणारा नसून, सर्वोच्च न्यायालयाच्या २०१६ मधील निर्देश आणि दिव्यांग व्यक्ती अधिकार अधिनियम २०१६ मधील तरतुदींचे उल्लंघन असल्याचा दावा केंद्रस्तर विशेष शिक्षकांनी केला आहे. केंद्रावर एकमेव शिक्षक असताना त्यांना पर्यायी व्यवस्था न करता ड्युटी कशी दिली? विशेष शिक्षकांचे काम तांत्रिक आणि संवेदनशील असते. त्यांना अशैक्षणिक कामात गुंतवणे म्हणजे दिव्यांग विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळण्यासारखे आहे. प्रशासनाने तात्काळ पर्यायी व्यवस्था करावी, अशी मागणी केंद्र स्तर विशेष शिक्षक उमेश शिंदे यांनी केली आहे.

सध्या शाळांमध्ये वार्षिक परीक्षा आणि मूल्यमापनाची तयारी सुरू आहे. दिव्यांग विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी विशेष सराव, प्रश्नपत्रिका समजून घेणे आणि लेखनिक मिळवण्यासाठी विशेष शिक्षकांचे तांत्रिक मार्गदर्शन अनिवार्य असते. मात्र, शिक्षण विभागाने जाणीवपूर्वक या विशेष शिक्षकांना शाळेऐवजी दारोदारी जाऊन मतदार शोधण्याचे किचकट वेळखाऊ कामांसाठी जुंपले आहे. केंद्रावर विशेष शिक्षकाचे 'एकमेव' पद असतानाही त्यांना पर्यायी व्यवस्था न करता निवडणूक कामाचे आदेश दिल्याने, शेकडो दिव्यांग विद्यार्थी सध्या मार्गदर्शनाअभावी हवालदिल झाले आहेत.

'दिव्यांग व्यक्ती अधिकार अधिनियम २०१६' नुसार, कोणत्याही दिव्यांग मुलाला शिक्षणापासून वंचित ठेवणे किंवा त्याच्या प्रगतीत अडथळा निर्माण करणे हा दखलपात्र गुन्हा आहे. तसेच, सर्वोच्च न्यायालयाने २०१६ मध्ये दिलेल्या स्पष्ट निर्देशांनुसार, विशेष शिक्षकांना त्यांच्या संवेदनशील अध्यापन कार्याव्यतिरिक्त इतर अशैक्षणिक कामांत गुंतवणे बेकायदेशीर ठरते. असे असूनही, मनपा शिक्षण विभागाने या कायदेशीर बाबींकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचे चित्र आहे. हा प्रकार 'न्यायालयीन अवमान' असल्याचे कायदेतज्ज्ञांचे म्हणणे आहे.

एकीकडे आमची मुले परीक्षेला सामोरे जात आहेत आणि दुसरीकडे त्यांना आधार देणारे शिक्षक घरोघरी जाऊन मतदार सर्वेक्षण करत आहेत. शिक्षण विभागाला आमच्या मुलांच्या भविष्याची काळजी नाही का? असा संतप्त सवाल पालकांनी उपस्थित केला आहे. प्रशासनाकडून तातडीच्या निर्णयाची अपेक्षा आहे. दिव्यांग विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये शिक्षणापासून वंचित राहू नये, यासाठी अहिल्यानगर मनपा आयुक्तांनी आणि शिक्षण विभागाने या प्रकरणाची तातडीने दखल घेणे गरजेचे आहे. विशेष शिक्षकांना बीएलओ कामातून तातडीने कार्यमुक्त न केल्यास, दिव्यांग हक्क कायद्यांतर्गत प्रशासनाविरुद्ध कायदेशीर दाद मागण्याचा पवित्रा पालकांनी घेतला आहे.

उमेश शिंदे यांनी तीन वेळा अर्ज देऊनही वास्तूस्थिती मांडली असता यावर तहसील कार्यालय व मनपा शिक्षण विभाग याकडून कुठलीही कार्यवाही करण्यात आली नाही. केंद्रस्तर विशेष शिक्षकांना जाणीवपूर्वक नियुक्त्या दिल्या असून त्याबदल्यात इतरांच्या नियुक्त्या रद्द करण्यात आलेल्या आहेत. यामध्ये मनपा शिक्षण विभागाची मध्यस्थी असल्याचे दाट संशय आहे. मनपा शिक्षण विभाग विशेष शिक्षकाबाबत कायम उदासीन असल्याचा देखील आरोप करण्यात आला आहे.

### ऐन परीक्षेचा काळ : दिव्यांग विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान आणि मार्गदर्शनाचा अभाव

केंद्रावर एकमेव शिक्षक असताना त्यांना पर्यायी व्यवस्था न करता ड्युटी कशी दिली? विशेष शिक्षकांचे काम तांत्रिक आणि संवेदनशील असते. त्यांना अशैक्षणिक कामात गुंतवणे म्हणजे दिव्यांग विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळण्यासारखे आहे. प्रशासनाने तात्काळ पर्यायी व्यवस्था करावी. २०१६ कायदा व न्यायालयीन निर्देश: विशेष शिक्षकांना अशैक्षणिक कामात लावणे बेकायदेशीर आहे. याबाबत शिक्षण विभागाचे दुर्लक्ष असून, केंद्र स्तर एकमेव पद असतानाही निवडणूक कामाचे सक्तीचे आदेश देण्यात आलेले आहे.

## नगरमध्ये पोलीस हवालदाराला ३५ हजारांची लाच घेताना पकडले

नगर – कौटुंबिक हिंसाचाराच्या गुन्ह्यात मदत करण्यासाठी आणि पोलीस ठाण्याचे वारंवार हेलपाटे वाचवण्यासाठी ३५ हजार रुपयांची लाच स्वीकारणाऱ्या तोफखाना पोलीस ठाण्यातील हवालदाराला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले. अनिल अजिनाथ गोसावी असे या लाचखोर पोलीस हवालदाराचे नाव असून, या कारवाईमुळे पोलीस दलात मोठी खळबळ उडाली आहे.

यातील फिर्यादी आणि त्यांच्या कुटुंबीयांविरुद्ध तोफखाना पोलीस ठाण्यात कौटुंबिक हिंसाचाराचा गुन्हा दाखल आहे. या गुन्ह्याचा तपास पोलीस हवालदार बाळासाहेब गिरी करत असून, त्यांचे मदतनीस म्हणून अनिल गोसावी काम पाहत होते. गोसावी यांनी फिर्यादीला फोन करून चौकशीसाठी बोलावले होते. दाखल गुन्ह्यात मदत करण्यासाठी आणि वारंवार पोलीस ठाण्यात चकरा मारायला लावू नये, या मोबदल्यात गोसावी यांनी ५० हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली होती. शेवटी ३५ हजार रुपये देण्याचे ठरले.

फिर्यादीने याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली होती. विभागाच्या पथकाने १५ एप्रिल रोजी तोफखाना पोलीस ठाणे परिसरात सापळा लावला. तडजोडीनंतर ठरलेली ३५ हजार रुपयांची लाच स्वीकारताना हवालदार अनिल गोसावी यांना पंचांसमक्ष ताब्यात घेण्यात आले. ही कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस उपअधीक्षक अजित त्रिपुटे, पोलीस निरीक्षक राजू आल्हाट आणि त्यांच्या पथकाने केली. आरोपीवर भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## नागरिकांच्या सतर्कतेमुळे दुचाकी चोरीचा प्रयत्न फसला

### बुरुड गल्ली परिसरातील घटना, गुन्हा दाखल

नगर – शहरात दुचाकी चोरीच्या घटनांमध्ये वाढ होत असतानाच, कोतवाली पोलीस ठाण्याच्या हद्दीत चोरीचा एक धाडसी प्रयत्न उघडकीस आला आहे. बुरुड गल्ली परिसरातील काळा मारुती मंदिरासमोर रात्रीच्या सुमारास उभ्या असलेल्या गाड्या चोरताना दोन अज्ञात चोरट्यांना नागरिकांनी रंगेहात पकडण्याचा प्रयत्न केला, मात्र चोरटे अंधाराचा फायदा घेऊन पसार झाले.

याबाबत मिळालेली सविस्तर माहिती अशी की, चंद्रकांत रतनलाल भंडारी (वय ६६) हे आपल्या कुटुंबासह बुरुड गल्लीत राहतात. त्यांच्या घराबाहेर त्यांची दुचाकी उभी होती. १५ एप्रिल रोजी पहाटे एक वाजेच्या सुमारास घराबाहेर काहीतरी हालचाल होत असल्याचे भंडारी यांच्या लक्षात आले. त्यांनी गॅलरीतून पाहिले असता, दोन अनोळखी इसम त्यांच्या गाडीला बनावट चावी लावून ती चालू करण्याचा प्रयत्न करत होते. गाडी चालू न झाल्याने या चोरट्यांनी आपला मोर्चा शेजारी राहणारे सोमनाथ बबनराव घोरपडे यांच्या दुचाकीकडे वळवला.

भंडारी यांनी तत्काळ आरडाओरडा करून चोरट्यांना हटकले. मालक जागे झाल्याचे पाहून दोन्ही चोरट्यांनी तेथून पळ काढला. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. या दोन अज्ञात चोरट्यांविरुद्ध चंद्रकांत भंडारी यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून परिसरात बसवण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या मदतीने चोरट्यांचा शोध घेतला जात आहे.

## चाकूने सपासप वार करत तरूणावर प्राणघातक हल्ला

### माळीवाडा बसस्थानकाजवळील घटना, आरोपीला अटक

नगर – शहरातील माळीवाडा बसस्थानक परिसरात एका तरूणावर चाकूने सपासप वार करत प्राणघातक हल्ला झाल्याची घटना १४ एप्रिल रोजी रात्री १०:४५ वाजता घडली. अमोल रमेश वानखेडे (वय ३५, रा. दीपनगर, रंगोली हॉटेल पाठीमागे, केडगाव) असे जखमी तरूणाचे नाव आहे. त्यांच्यावर खासगी रूग्णालयात उपचार सुरू आहेत. त्यांनी दिलेल्या जबाबावरून कोतवाली पोलीस ठाण्यात राहील आसिर शेख (वय २२, रा. तपोवन रोड)याच्याविरूध्द खूनाचा प्रयत्न, अॅट्रॉसिटी आदी कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी त्यास १५ एप्रिल रोजी दुपारी अटक केली आहे.

फिर्यादी वानखेडे हे १४ एप्रिल रोजी रात्री ११:४५ वाजताच्या सुमारास माळीवाडा बसस्थानकासमोरील सारंग पान शॉपजवळून आपल्या घराकडे जात होते. यावेळी शेख याने त्यांना अडवून तू कोठून आला आहेस असा सवाल करत विनाकारण वाद घालण्यास सुरुवात केली. फिर्यादीने त्यास समजावण्याचा प्रयत्न केला असता, शेख याने त्यांना जातीवाचक शिवीगाळ केली. वादाचे रूपांतर हाणामारीत झाले आणि संतापलेल्या शेख याने तुला आता जिवेच मारतो, अशी धमकी देत आपल्याकडील चाकूने फिर्यादीवर सपासप वार केले. फिर्यादी रक्ताच्या थारोळ्यात पडले. गंभीर जखमी झालेल्या फिर्यादीला तातडीने उपचारासाठी खासगी रूग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी दिलीप टिपरसे, पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड, सहाय्यक पोलीस निरीक्षक कुणाल सपकाळे यांनी पथकासह घटनास्थळी धाव घेतली. जखमीच्या जबाबावरून गुन्हा नोंद करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस उपअधीक्षक टिपरसे करीत आहेत.

## लोकसभेची सदस्यसंख्या वाढविण्याच्या प्रस्तावावर तीव्र आक्षेप, संख्या नव्हे, विचारसरणी बदलली पाहिजे

नगर – लोकसभेची सदस्यसंख्या ५४३ वरून ८५० करण्याच्या प्रस्तावाबाबत पीपल्स हेल्पलाईन व भारतीय जनसंसद यांच्या वतीने तीव्र चिंता व्यक्त करण्यात आली असून, या निर्णयामुळे शासन व्यवस्थेत गोंधळ व असमतोल वाढण्याची शक्यता असल्याचा आरोप करण्यात आला आहे. हा प्रस्ताव केवळ संख्यात्मक वाढ नसून देशाच्या शासन व्यवस्थेच्या गुणवत्तेशी संबंधित मूलभूत प्रश्न उपस्थित करणारा असल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे.

ज्येष्ठ विधीज्ञ अॅड. कारभारी गवळी यांनी सांगितले की, सध्याच्या संसद कार्यपद्धतीत अनेकदा गोंधळ, ठप्प कामकाज आणि पक्षीय संघर्ष यामुळे लोकहिताचे प्रश्न दुय्यम ठरतात. अशा परिस्थितीत केवळ सदस्यसंख्या वाढविणे हा उपाय नसून, त्यामुळे सरकारमधील अनागोंदी वाढण्याचा धोका अधिक आहे.


अॅड. गवळी यांनी पुढे सांगितले की, इंटिग्रेटेड नॉलेज थिअरी (एकात्मिक ज्ञान सिद्धांत) नुसार प्रत्येक प्रतिनिधीच्या निर्णयक्षमतेवर त्याच्या नॉन–जेनेटिक इन्फॉर्मेशन (अजनुकीय माहिती) चा प्रभाव असतो. जर ही माहिती सेंट्रिपिटल (स्वार्थी व सत्ताकेंद्रित) स्वरूपाची असेल, तर सबकॉन्शिओ गव्हर्नन्स (अवचेतन शासन) निर्माण होते. अशा परिस्थितीत सदस्यसंख्या ५४३ असो किंवा ८५०, परिणाम अराजकतेकडेच झुकतो, असे त्यांनी स्पष्ट केले.

प्रस्तावित परिसीमन जर जनगणनेशिवाय करण्यात आले, तर डेटा एंट्रॉपी (माहितीतील विस्कळीतपणा) निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे काही राज्यांचे प्रतिनिधित्व कमी होऊन फेडरल एंट्रॉपी (संघराज्यीय असमतोल) निर्माण होऊ शकतो. हा प्रकार संविधानिक समतोलासाठी घातक ठरणार असल्याचा दावा करण्यात आला आहे.

पीपल्स हेल्पलाईनने यावर पर्यायी उपाय म्हणून रिकॉन्शिओ गव्हर्नन्स (सजग व पुनर्विचारी शासन प्रणाली) मांडली आहे. या संकल्पनेअंतर्गत तीन मूलभूत असलेले स्तंभ स्पष्ट करण्यात आले आहे. यामध्ये लोकभक्ती– लोकहितासाठी निस्वार्थ दृष्टिकोन, ज्ञानभक्ती– तर्क, विज्ञान आणि समज यांवर आधारित निर्णय व कर्मभक्ती– निष्काम व जबाबदार कृती यांचा समावेश आहे. संस्थेच्या वतीने देशभरात जनलोक मानसशास्त्र क्रांती आणि अजनुकीय माहिती सुधारणा अभियान राबविण्याचे आवाहन करण्यात आले आहे, ज्यायोगे नागरिक व लोकप्रतिनिधी यांच्या विचारप्रणालीत सकारात्मक बदल घडवून आणता येणार असल्याचे म्हंटले आहे.

संख्या वाढवून संसद सुधारत नाही, मन बदलल्याशिवाय शासन बदलत नाही, अशी भूमिका संघटनेने मांडली आहे. या प्रस्तावाला अॅड. कारभारी गवळी, अशोक सब्बन, अॅड. अमित थोरात, अॅड. लक्ष्मण पोकळे, प्रकाश थोरात, महेबुब सय्यद, प्रकाश गोसावी, प्रतीक म्हस्के, वीर बहादुर प्रजापती, पोपट भोसले, अशोक भोसले, रमा आढाव, आनंदा आढाव, संजय शेकडे, शाहीर कान्हू सुंबे, बाजीराव गव्हाणे, लखन साळवे आदींनी संघटनेच्या माध्यमातून विरोध दर्शविला आहे.

## गुरदीपसिंग सहम्बी यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – डॉक्टर कॉलनी, बुरुडगाव रोड येथील रहिवासी व इंडियन सिमलेस मेटलचे संचालक सरदार गुरदीपसिंग सहम्बी (वय ९४) यांचे १५ एप्रिल रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे १ मुलगा, सुन, नातवंडे असा परिवार आहे. विजय सहम्बी यांचे वडील तर नांदगाव येथील गनपावडर हॉटेलचे गगनदीप सहम्बी यांचे आजोबा होत.

## शांताराम फुलपगार यांचे अल्प आजाराने निधन




नगर – सावेडीतील सोनानगर येथील ज्येष्ठ नागरिक व सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे निवृत्त कर्मचारी शांताराम (बापू) राजाराम फुलपगार (वय ७९) यांचे नुकतेच अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, मुलगा, सुना, नातवंडे असा परिवार आहे. सेंट्रल बँकेतील प्रदीर्घ सेवेनंतर ते २००७ साली निवृत्त झाले होते.

## यशवंत नवले यांचे हृदयविकाराने निधन



नगर – नवीपेठ येथील रहिवासी यशवंत नामदेवराव नवले (काका) (वय ७२) यांचे १५ एप्रिल रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, मुलगी, सुन, जावई असा परिवार आहे. अमृता नवले यांचे पती, प्रतीक नवले यांचे वडील तर केतन व कुमार नवले यांचे चुलते होत.

## आसाराम एकाडे यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – बुरुडगाव रोड, एकाडे मळा येथील आसाराम यादव एकाडे (वय ९५) यांचे १६ एप्रिल रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे ४ भाऊ, भावजया, ४ मुले, सुना, मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## नगर–दौंड रोडवर वाहनाच्या धडकेत मोटारसायकल वरील तरुणाचा मृत्यू

नगर – नगर–दौंड रस्त्यावरील खडकी शिवारात एका अज्ञात वाहनाने मोटारसायकलला जोराची धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात ३९ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला आहे. सतीश सदाशिव गावडे (रा.निंबवी, ता.श्रीगोंदा) असे या अपघातात मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तीचे नाव आहे. याप्रकरणी अज्ञात वाहन चालकाविरुद्ध नगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

श्रीगोंदा तालुक्यातील निंबवी येथील रहिवासी सतीश गावडे हे ५ एप्रिल रोजी सकाळी पावणे सहा वाजेच्या सुमारास त्यांच्या मोटारसायकलवरून नगर–दौड रस्त्याने जात होते. खडकी गावाच्या परिसरात आले असता, समोरून भरधाव वेगात आलेल्या एका अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. हा अपघात इतका भीषण होता की, यामध्ये सतीश यांच्या शरीराला गंभीर जखमा झाल्या आणि त्यांचा मृत्यू झाला. अपघातानंतर संबंधित अज्ञात चालक जखमीला कोणतीही मदत न करता किंवा पोलिसांना माहिती न देता वाहन घेऊन घटनास्थळावरून पसार झाला.

याप्रकरणी मृत सतीश यांचे भाऊ सुधीर सदाशिव गावडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात चालकावर भारतीय न्यायसंहिता आणि मोटार वाहन कायद्याच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. घटनेचा अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश वारुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार खरात हे करत आहेत. अपघातातील दोषी चालकाचा शोध घेण्यासाठी पोलीस परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासत आहेत.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्ट मधील वर्णन केलेल्या प्लॉट मिळकतीचे विद्यमान मालक **प्रितेश अशोक मेहता,** रा.लालटाकी, अहिल्यानगर हे सामाईक क्षेत्राचे मालक असून त्यांनी सदर मिळकतीबाबत आमचे आशिलाबरोबर सौदा करुन सदर मिळकत खरेदी देण्याचे कबुल केले आहे. त्यानुसार, सदरची मिळकत निर्वेध, निजोखमी असल्याचा हवाला विद्यमान मालक यांनी आमचे पक्षकारास दिलेला आहे. तसेच आमचे विरहीत इतर कोणा बरोबरही कोणताही व्यवहार केलेला नाही असे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. सदरची मिळकत आमचे पक्षकारांनी बैठक घेवुन बाजारभावाने योग्य किंमत ठरवून खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे. तरी, या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सदर मिळकतीबाबत कोणताही वाद चालू असल्यास अथवा गहाणखत, दान, बक्षीस पत्र, अव्वल जप्ती बँक/ पतसंस्था बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकुम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट, बेनामी अगर इतर कोणताही वाद असल्यास संबंधितांनी अस्सल कागदपत्रांसह सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांचे आत खालील पत्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. सदरचे व्यवहारास कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदर मिळकतीचे व्यवहारास, खरेदीस कायदेशीररित्या कोणाचीही काहीही हरकत नाही असे कायद्यानुसार समजण्यात येवून आमचे आशिल नमूद मिळकतींचे ठरविण्यात आलेला खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. या जाहीर नोटीसची मुदत संपलेनंतर आलेल्या कोणत्याही हरकतीस आमचे आशिल कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाहीत. त्यानुसार जाहीर नोटीस प्रसिध्द केली असे.

**परिशिष्ट : मिळकतीचे वर्णन** : डि.।। अहिल्यानगर सब डि. ।। तालुका नगर येथील जिल्हा परिषद पैकी ग्रामपंचायत हद्दीतील मौजे बारादरी येथील गट नं.१२४ मधील शेत जमिन मिळकतीचे वर्णन –

| सि.सर्व्हे नंबर | क्षेत्रफळ हे.आर | चतु:सिमा | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | पूर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| १२४ | ० हे.१६.७५ आर | गट नं.१२५ | मेहेकरी रोड | गट नं.१२३ | गट नं.८० |

येणेप्रमाणे चतु:सिमापूर्वक शेत जमिन मिळकत आणि त्यामधील झाडे, झुडुपे, दगड, माती इ.सर्व तदंगभुत वस्तुंसह, वागणुकीचे वहिवाटीच्या हक्कासह काहीही एक राखून न ठेविता असलेली मिळकत.

ता. १६/०४/२०२६, अहिल्यानगर

**अॅड. विजय आर. गुंदेचा**
(बी.कॉम., एलएल.एम., सी.एस., डी.टी.एल., डी.एलएल अँण्ड एल.डब्लु.,जी डी सी अँण्ड ए.)
**अॅड.किमया व्हि. गुंदेचा**
(बी.एस.एल., एल एल.बी., जी डी सी अँण्ड ए.) अँडव्होकेटस, २०८, करण कोर्ट बिल्डींग, तळमजला, जुने जिल्हा न्यायालया समोर, अहमदनगर मोबा.नं.९८९०९०१११७

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्ट १ मध्ये नमुद केलेल्या मिळकतीचे मालक हे जतिंदर विश्वंभरलाल अॅबट हे असून सदरची मिळकत ही त्यांनी मुळ मालक यांचेकडून मे. दिवाणी न्यायाधीश साहेब वरिष्ठ स्तर, अहमदनगर यांचेकडील विशेष दिवाणी दावा नंबर १४९/२०१७ मध्ये तडजोड करुन खरेदी केलेली आहे. खरेदी झाल्यानंतर सदरच्या मिळकतीची ताबा पावती देखील मुळ मालकाबरोबर लगेचच झालेली असून सन २०२२ पासून अविरतपणे जतिंदर विश्वंभरलाल अॅबट यांचा ताबा आहे. सदरच्या मिळकतीशी अहमदनगर मर्चंटस को ऑप.बँक लि. यांचा कुठल्याही प्रकारचा संबंध नाही. अहमदनगर मर्चंटस को ऑप.बँक लि. यांचेविरुध्द मालक जतिंदर विश्वंभरलाल अॅबट यांनी ना. उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद यांचेकडे रिट पिटिशन नंबर ३१४१/२०२६ व रिट पिटिशन नंबर ३१३३/२०२६ चे दाखल केलेले असून ते प्रलंबित आहे. त्यामुळे त्यांचेबरोबर कुठल्याही प्रकारचा व्यवहार करु नये. नंतर कोणाचीही कसलीही तक्रार, हरकत चालणार नाही याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट : १) मिळकतीचे वर्णन** :– जिल्हा अहमदनगर पोट तुकडी तालुका नगर पैकी मौजे सावेडी हद्दीतील बिनशेती खुली प्लॉट मिळकत खालील वर्णनाच्या **अ. डि. अहमदनगर सब डि. ता. नगर पैकी मौजे सावेडी येथील गट नं ८७/अ २ पैकी प्लॉट नंबर १२ चे क्षेत्र ३२३.४२ चौ.मी** कलम अ मधील मिळकत यांसी चतु:सिमा : रेकॉर्डप्रमाणे – येणेप्रमाणे चतु:सीमापूर्वक बिगरशेती प्लॉट मिळकत, तदंगभूत वस्तूसुध्दा व वागणुकीचे व वहिवाटीचे हक्कसुध्दा, काहीएक राखून न ठेवता संपूर्ण मिळकत.

अहमदनगर
ता. १६/०४/२०२६

**अॅड. संकेत एस.सुंबे**
बी.एस.एल.एलएल.बी., रजि.नं.एमएएच/२०१८/२०१३
बार रुम नं.२, नवीन जिल्हा कोर्ट,अहमदनगर, मो : ९४०५१३३०७७

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमुद केलेला प्लॉट मिळकत विद्यमान मालक **वहिदा उस्मान पठाण रा. घर नं. ६५१३/अ, भाकरे गल्ली, सर्जेपुरा, अहिल्यानगर/अहमदनगर.** यांचे मालकी वहिवाटीचा आहे. सदर प्लॉट मिळकतीचे विक्री करण्याचा करार करुन आमचे अशिलांबरोबर कायमखुष खरेदी देण्यांचे ठरविले आहे. तसेच सदरची मिळकत निर्वेध, निजोखमी असल्याबाबत आमचे अशिलास विश्वास व भरोसा दिलेला आहे.

परंतु कोणाचीही तक्रार राहु नये म्हणून या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की सदर मिळकतीबाबत कोणतेही चालू वाद असल्यास अथवा साठेखत, खरेदीखत,गहाणखत, दान, वारस हक्क, बक्षिसपत्र मनाईहुकुम, दावा कोर्ट कारवाई बँक बोजा सोसायटी राईटस अन्य वस्त्र लिज अथवा अगर कोणताही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास संबंधीताने ही नोटीस प्रसिध्द झाले पासून **७ दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपूर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर प्लॉट खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिले आहे, असे समजण्यांत येईल.

**परिशिष्ट : मिळकतीचे वर्णन** – जिल्हा अहिल्यानगर, पोट तुकडी व तालुका नगर पैकी अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील **मौजे भिंगार** येथील **सि.आय.व्ही.को. ऑप हौसिंग सोसायटी मधील** खुल्या प्लॉट मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

| सर्व्हे नं. | प्लॉट नं. | चौ. मीटर |
|---|---|---|
| ३२५/१/३२५/२अ | १०२ अ | १४०.४७ |

**(संगणकीकृत ७/१२ उताऱ्याप्रमाणे स. नं.३२५/१/३ २५/२अ/प्लॉट नं १० २अ) या संपुर्ण प्लॉट मिळकतीबाबत. यांसी चतु:सिमा–**
पुर्वेस :– रस्ता, दक्षिणेस :– प्लॉट नं.१०२ ब
पश्चिमेस :– प्लॉट नं.१०६,
उत्तरेस :– प्लॉट नं. १०१,
दि. १६/०४/२०२६
अहिल्यानगर

**अॅड. नाजीम अहमद इस्माईल शेख**
**अॅड. कुरेशी फैजान फारुक**
जुन्या कलेक्टर ऑफिसशेजारी,डावरेगल्ली, अहमदनगर, मो : ९८८१४३१८६०, ७२७६२५२४७८

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमूद केलेली जमिनीचे विद्यमान मालक **१) लतीफ रज्जाक शेख, २) अल्ताफ रज्जाक शेख, ३) अरबाज अन्वर शेख सर्व रा. मुकंदनगर, अहिल्यानगर** यांचे मालकी हक्काची व वहिवाटीची असून यांनी सदर जमीन विक्री करण्याचा करार करुन आमचे अशिलांबरोबर कायमखूष खरेदी देण्यांचे ठरवून आमच्या अशिलाकडून रक्कम स्विकारलेली आहे. तसेच सदर जमीन मिळकत ही निर्वेध निजोखमी व बोजारहीत, असल्याची विश्वास व भरवसा आमचे अशिलांस दिलेला आहे.

या उपरही सदर जमीन मिळकती बाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क,हितसंबंध, ताबा, मनाई, दावा, लिज, गहाण, इक्वीटेबल मॉर्गेज, दान, बक्षिस,पोटगी हक्क, सोसायटी राईटस व इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यांस त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासून **७ दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर जमीन मिळकतीचा खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे असे समजण्यांत येईल.

**परिशिष्ट : मिळकतीचे वर्णन** :– डि.।। अहिल्यानगर सब. डि.।। ता. नगर पैकी अहिल्यानगर जिल्हा परिषद हद्दीतील **पोखर्डी** येथील जमीनीचे वर्णन खालील प्रमाणे.

| ग.नं. | हे.आर. | रु.पै. |
|---|---|---|
| १७२/पै | २–८६ | २–५० |

**यापैकी विद्यमान मालक यांच्या एकत्रित मालकी हिश्याची ० हे. ०२ आर (२०००.०० चौ. फुट) जमिनीबाबत. याचा नियोजित प्लॉट नं. ३२ असा आहे. यांसी चतु:सिमा–**
पुर्वेस – गट नं. १७२ पैकी, दक्षिणेस – गट नं. १७२ पैकी नियोजित प्लॉट नं. ३३ व ३६
पश्चिमेस – १८ फुट रस्ता, उत्तरेस – गट नं. १७२ पैकी नियोजित प्लॉट नं. ३१
येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक काही एक राखुन न ठेविता.
दि. १६/०४/२०२६
अहमदनगर

**अॅड. नाजीम अहमद इस्माईल शेख**
**अॅड. कुरेशी फैजान फारुक**
जुन्या कलेक्टर ऑफिसशेजारी,डावरेगल्ली, अहमदनगर, मो : ९८८१४३१८६०, ७२७६२५२४७८

# गृहिणी

## आरोग्य

### उपवास करत असाल तर...

कुट्टूचे पीठ कर्बोदके आणि प्रथिनांनी समृद्ध असून उपवासाच्या काळात त्वरित ऊर्जा देते. त्यातील उच्च फायबरच्या प्रमाणामुळे जेवणानंतर बराच वेळ पोट भरलेले राहते, ज्यामुळे अति खाणे टळते आणि वजन नियंत्रणात राहते. हृदयरुग्णांसाठी कुट्टू एक वरदान आहे. त्यातील अँटिऑक्सिडंट्स वाईट कोलेस्ट्रॉल कमी करण्यास मदत करतात. शिवाय, त्यातील मॅग्नेशियम आणि फायबरच्या उपस्थितीमुळे रक्तदाब नियंत्रित राहतो, ज्यामुळे उपवासादरम्यान उच्च रक्तदाब टाळता येतो. उपवासादरम्यान अनेकदा गोड खाण्याची इच्छा होते. कुट्टूचा ग्लायसेमिक इंडेक्स खूप कमी असतो, म्हणजेच त्यामुळे रक्तातील साखरेची पातळी अचानक वाढत नाही. मधुमेही रुग्णसुद्धा कोणत्याही काळजीशिवाय कुट्टूची खीर किंवा खिचडीचा आनंद घेऊ शकतात. कॅल्शियम आणि मॅग्नेशियमने समृद्ध असल्यामुळे ते हाडे मजबूत करते. शिवाय, त्यातील बी जीवनसत्त्वे आणि अँटिऑक्सिडंट्स फ्री रॅडिकल्सशी लढून तुमची त्वचा चमकदार ठेवतात आणि वृद्धत्वाची चिन्हे कमी करतात.

## पाककला

### फ्रूट क्रीम

**साहित्य** – फ्रेश क्रीम २ कप (अमूल फ्रेश क्रीम किंवा घरच्या दुधाची घट्ट साय फ`टून घेतलेली), पिठीसाखर ४–५ मोठे चमचे (किंवा चवीनुसार), व्हॅनिला इसेन्स ४–५ थेंब (ऐच्छिक). फळे २ कप बारीक चिरलेली (सफरचंद, केळी, डाळिंब, द्राक्षे, चिकू, आंबा किंवा पपई), सुका मेवा काजू, बदाम, पिस्त्याचे काप (सजावटीसाठी)

**कृती** – क्रीम फेटून घ्या एका मोठ्या बाऊलमध्ये थंड फ्रेश क्रीम घ्या. त्यात पिठीसाखर आणि व्हॅनिला इसेन्स टाका. आता एकाबिटरने क्रीम हलके आणि मऊ होईपर्यंत नीट फेटून घ्या. क्रीम जास्त फेटू नका, अन्यथा त्याचे लोणी होईल. फळे तयार करा सर्व फळे धुवून त्यांचे मध्यम तुकडे करून घ्या. द्राक्षे मोठी असतील तर त्याचे दोन भाग करा. एकत्र करा फेटलेल्या क्रीममध्ये सर्व चिरलेली फळे टाका आणि हलक्या हाताने मिक्स करा. ते २ तास फ्रिजमध्ये थंड होण्यासाठी ठेवा. फ्रूट क्रीम जितकी थंड असेल तितकी जास्त चविष्ट लागते. वरून सुका मेवा आणि थोडे डाळिंबाचे दाणे टाकून सजवा.

## वास्तू

### मृत व्यक्तीचे फोटो

* मृत व्यक्तीचे फोटो दक्षिण अभिमुख होऊ शकणार नाहीत. शक्यतोवर मृत व्यक्तीचे फोटो लावताना दक्षिण दिशेला त्यांचे मुख असेल असे लावावेत कारण ती मोक्षाची दिशा मानली जाते.

* मृत व्यक्ती गेल्यानंतर तरी आपण रोज त्यांना एक मनःपूर्वक नमस्कार फोटो पाहून करावा आणि त्यांचे कर्तृत्व विनम्रपणे मान्य करावे. यासाठीच मृत व्यक्तीचे फोटो घरात लावलेले असतात.

## सौंदर्य

चेहऱ्यावर मुलतानी माती लावल्याने तुमचा चेहरा तजेलदार होईल. मुलतानी म ातीत गुलाब पाणी टाकून चेहऱ्यावर लावल्यास त्याचे जास्त चांगले फायदे मिळतात. मुलतानी माती तुमच्या चेहऱ्यावरील अतिरिक्त तेल कमी करते. तसेच चेहरा मऊ देखील राहतो.

## सल्ला

इडलीचे तांदूळ भिजवताना त्यात थोडे साबुदाणे आणि मेथी दाणे टाका इडली कापसासारखी मऊ होईल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

शुक्रवार, दि. १७ एप्रिल २०२६

**दर्श अमावास्या, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, चैत्र कृष्णपक्ष, रेवती १२।०२, सूर्योदय ०६ वा. २९ मि. सूर्यास्त ०५ वा. ३१ मि.**

### राशिभविष्य

**मेष** : आपणास प्रोत्साहित करणारे घटक जाणून घ्या. भीती, चिंता, शंका, राग, लोभ असे नकारात्मक दृष्टीकोन तुम्हाला सोडावे लागतील.

**वृषभ** : तुमचे जीवन बदलण्यासाठी पत्नी मदत करील. स्वत:च्या प्रयत्नाने तुम्ही तुमचे जीवन फॅशनेबल करू शकाल.

**मिथुन** : आज पत्नीसुख मिळेल. उतावीळपणे कोणताही निर्णय घेऊ नका, अन्यथा त्यामुळे आयुष्यात नंतर पश्चाताप करावा लागेल.

**कर्क** : दुसऱ्यांवर प्रभाव पडावा म्हणून मर्यादेच्या बाहेर खर्च करू नका. दुसऱ्यांना मदत करण्याची तुमची ताकद, सकारात्मक विचारांनी सुधारा.

**सिंह** : आजच्या दिवशी आपल्या खर्चावर नियंत्रण मिळवाल, चैनीसाठी पैशांची उधळपट्टी होणार आहे.

**कन्या** : तुम्ही तुमच्या प्रिय पत्नीशी पूर्वी झालेल्या मतभेदांबद्दल तिला माफ कराल. गैरसमज दूर होतील.

**तूळ** : मित्र तुमच्या खुल्या मनाची आणि सहनशक्तीची परीक्षा पाहतील. आर्थिक व्यवहारांमध्ये गुंतले जाणार नाही याची काळजी घ्या.

**वृश्चिक** : पुरेशी विश्रांती घ्याल. मागील उधारी वसुल होईल. जुने मित्र व नातेवाईक यांच्यासमवेत दिवस आनंदात जाईल. वाहने व उपकरणे खराब होतील.

**धनु** : हितशत्रू डोके वर काढतील. कामात उतावीळपणा केल्यास मनशांती गमावून बसाल.

**मकर** : आरोग्य विषयक असलेल्या जुन्या समस्या जातील मात्र आर्थिक प्रश्न आ वासून उभे राहतील.

**कुंभ** : व्यावसायिक नुकसान होईल. भाऊबंद वडीलोपार्जित मालमत्तेवरुन कटकटी करतील.

**मीन** : अतिखर्च, उधळेपणा आणि शंकास्पद आर्थिक योजनांमध्ये गुंताल. मातृचिंता सतावेल.

## फिल्मीचक्कर क्र. १२३२ सौ. शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | २ | | ३ | ■ | ४ |
| | ■ | ■ | | ■ | | ■ | |
| | ■ | ५ | | | | ६ | ■ |
| ■ | ७ | ■ | | ■ | ■ | ८ | |
| ९ | | १० | | ■ | ११ | | ■ |
| | ■ | | ■ | १२ | ■ | १३ | १४ |
| | ■ | १५ | १६ | | ■ | १७ | |
| १८ | | ■ | १९ | | ■ | ■ | ■ |

**आडवे शब्द :–** १) 'कुर्बानी, लावारीस, सत्यम् शिवम् सुंदरम्, डॉन' आदी चित्रपटांची नायिका ५) +++ ++ पुकार के (चित्रपटाचे नाव) ८) ++ दिया जाय या छोड दिया जाय बोल तेरे साथ क्या (गाणे) ९) 'रंभ हो हो हो' हे हिट गाणे असलेला चित्रपट ११) ++ देव (जुन्या काळातील मराठी चित्रपट अभिनेत्री) १३) ++ चंदावरकर (अभिनेत्री) १५) या चित्रपटात अमिताभ बच्चन यांची तिहेरी भूमिका आहे १७) ++ गुप्ता (अभिनेत्री) १८) ++ फरिश्ता (चित्रपटाचे नाव) १९) ++ मंगेशकर (प्रसिद्ध गायिका)

**उभे शब्द :–** १) +++ उस पार (चित्रपटाचे नाव) २) 'जो जीता वही सिकंदर, गजनी, लगान' आदी चित्रपटाचा नायक ३) स्वर्ग +++ (चित्रपटाचे नाव) ४) 'झूठ बोले कौवा काटे' हे गाणे असलेला ऋषी कपूर, डिंपल कापडिया यांचा चित्रपट ६) 'सपनों का सौदागर, जुगनू, शोले, रझिया सुलतान, संन्यासी, दस नंबरी' आदी चित्रपटांची नायिका ७ ) ++ ही प्यार (चित्रपटाचे नाव) ९) ++ ++ आधी रात (चित्रपटाचे नाव) १०) नसिरुद्दीन शहा, शबाना आझमी, जुगल हंसराज, सुप्रिया पाठक, सईद जाफरी यांचा एक चित्रपट १२) +++ हवालदार (चित्रपटाचे नाव) १४) ++ पाटेकर (अभिनेता) १६) ++ कैसा है जनाब का क्या खयाल है आप का (गाण्याचे बोल)

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार** : अपमानाचे उत्तर देण्यात वेळ घालवू नये तर अपमान करणाऱ्यालाच आपली गरज पडेल इतके मोठे व्हावे.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### बाजारात मिळणारा भेसळयुक्त कलिंगड कसा ओळखाल?

सध्या भेसळीची समस्या सर्वच अन्नपदार्थांवर परिणाम करत आहे. काही व्यापारी कलिंगड लवकर पिकवण्यासाठी आणि आतून लाल दिसण्यासाठी इंजेक्शन्सचा वापर करत असल्याचा इशारा तज्ज्ञांनी दिला आहे. भेसळयुक्त कलिंगड खाल्ल्याने आरोग्याच्या समस्या निर्माण होण्याचा धोका असल्याचे ते सुचवतात. या संदर्भात, कलिंगड खरेदी करताना, ते नैसर्गिक आहे का? की भेसळयुक्त? आता ते कसे ओळखायचे ते जाणून घेऊया. यावर्षी उन्हाची तीव्रता अधिक असणार आहे. एप्रिल महिन्यापूर्वीच दिवसाचे तापमान वाढत आहे. या उष्णतेपासून आराम मिळवण्यासाठी अनेक लोक ताक, नारळपाणी आणि उसाचा रस यांसारखे थंड पेये तसेच शरीराला थंडावा देणारी फळे सेवन करत आहेत.

उष्णतेपासून आराम देणाऱ्या फळांमध्ये कलिंगडचा क्रमांक लागतो. त्यात पाण्याचे प्रमाण जास्त असते आणि त्यात फायबर, पोटॅशियम, कॅल्शियम, मॅग्नेशियम, व्हिटॅमिन ए आणि व्हिटॅमिन सी सारख्या पोषक घटकांचा समावेश असतो. त्यामुळे लहान मुलांपासून ते प्रौढांपर्यंत सर्वजण हे फळ मोठ्या आनंदाने खातात. पण, भेसळीची समस्या सध्या सर्वच अन्नपदार्थांवर परिणाम करत आहे. यासाठी बाजारातून कलिंगड खरेदी करताना, प्रथम एक लहान तुकडा कापायला सांगा. नंतर, एक लहान कापसाचा गोळा किंवा टिश्यू पेपर घ्या आणि तुकड्याच्या आतील बाजूस हलकेच घासून घ्या. जर कापूस किंवा टिश्यू पेपर घासल्यानंतर लाल झाला तर कलिंगड भेसळयुक्त मानला पाहिजे. कारण अशा प्रकरणांमध्ये, कलिंगड लाल दिसण्यासाठी त्यात एरिथ्रोसिन नावाचे रसायन टाकले जाते. हे रसायन असलेले कलिंगड खाणे आरोग्यासाठी हानिकारक असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. जर टिश्यू पेपरचा रंग एकाच वेळी बदलला नाही तर टरबूज नैसर्गिक मानला जाऊ शकतो.

आंब्याप्रमाणेच, काही व्यापारी कलिंगड लवकर पिकवण्यासाठी कार्बाइड नावाचे रसायन वापरतात. या रसायनाने प्रक्रिया केलेल्या कलिंगडांच्या वरच्या बाजूला पिवळे डाग दिसतात. तज्ज्ञांनी असा इशारा दिला आहे की, अशी फळे आरोग्यासाठी चांगली नाहीत. जर कलिंगडावर पिवळे डाग दिसले तर खाण्यापूर्वी ते मीठ पाण्याने चांगले धुवावे असा सल्ला डॉक्टर देखील देतात.

कलिंगड खरेदी करण्यापूर्वी, तुम्ही त्याच्या वरच्या भागाचे काळजीपूर्वक परीक्षण केले पाहिजे. जर तुम्हाला फळावर लहान छिद्रे दिसली तर असे कलिंगड न खरेदी करणे केव्हाही चांगले. कारण तज्ज्ञ म्हणतात की, ती छिद्रे इंजेक्शनच्या खुणा असू शकतात. म्हणूनच, जर तुम्हाला उन्हाळ्यात कलिंगड खाताना तुमचे आरोग्य राखायचे असेल तर तुम्ही या छोट्या खबरदारीचे पालन केले पाहिजे.

## एक होती चिमणी

एक होती चिमणी ती फांदीवरून चिवचिवत खूप उंच उडायची. व ती फांदीवरून फांदीवर उड्या मारायची. पण चिमणीला एक सवय होती, दिवसा तिच्यासोबत काहीही घडले तरी, चांगले किंवा वाईट, ती शक्य तितके दगड एका गठ्ठ्यात बांधून ठेवायची. ती अनेकदा ते दगड गठ्ठ्यातून बाहेर काढून त्यांच्याकडे पाहायची. चांगले दगड पाहून, भूतकाळात घडलेल्या चांगल्या गोष्टी आठवून तिला आनंद व्हायचा. आणि वाईट दगड पाहून तिला दुःख व्हायचे. ती हे रोज करायची. जसे जसे ती दगड गोळा करत गेली, तसा तसा तिचा गठ्ठा जड होत गेला. काही दिवसांनी, त्या जड गठ्ठ्यामुळे तिला उडणे कठीण होऊ लागले. पण तिला हे समजत नव्हते की ती का उडू शकत नाही. आणखी काही काळ गेला, आणि तो गठ्ठा आणखी जड झाला. आता तर तिला जमिनीवर चालणेही कठीण होऊ लागले होते. आणि एक दिवस असा आला की, ती स्वतःसाठी अन्न आणि पाण्याची सोयही करू शकली नाही आणि दगडांच्या ओझ्याखाली दबून मरण पावली.

तात्पर्य : प्रत्येक गोष्टीचा अतीविचार करू नये.

## जीवन का अमृत (भाग १)



आपके पत्र में मैंने पढ़ा कि आपकी तीव्र चाहत है कि आपको दिव्य ज्ञान मिल जाए और आप आत्मा की मुक्ति पा जाएँ। जो के लिए तड़पते हैं, उनके लिए प्रभु इंतजाम करता है, ताकि उनकी इच्छाएँ पूरी हो सकें ।

कृपया संत-महात्माओं की शिक्षाओं को और विस्तार से पढ़ें और जब आप यह कर लें, तो अपने नजदीकी प्रतिनिधि के पास जाकर निर्धारित फार्म पर व्यावहारिक शिक्षा (नामदान) के लिए आवेदन कर सकते हैं, जो कि अंतर में प्रभु की ज्योति और अलौकिक संगीत से जुड़ना है और जिसे दिन-प्रतिदिन कामिल सत्गुरु की छत्रछाया में विकसित करना होता है ।

३७. आप सहमत होंगे कि यह निरन्तर बेचैन मन है, जो कि आंतरिक उन्नति में सबसे बड़ी बाधा बनता है और इसको बंदी बनाने का सर्वोत्तम तरीका

### निरंतर बेचैनी

है, इसको ऐसी अनुशासित दिनचर्या में बाँधना, जो कि नियमित भजन-सिमरन में सहायक हो। भजन-सिमरन के महान क्षणों में ही बालक शिष्य अनन्त से जुड़कर दिव्य दया के असीम प्रवाह से लाभान्वित होता है और तभी उसे सही समझ का अनूठा वरदान अधिक से अधिक मात्रा में मिलता है।

३८. सत्गुरु की इच्छा के आगे किसी एक दरजे का आत्म समर्पण करने के लिए हम अपने इष्ट (गुरु) को उसके निराकार रूप में ना देखें, बल्कि उसे इंसानी जामे में, सत्गुरु के रूप में देखें । नहीं तो हम प्रभु की इच्छा को कैसे जान सकते हैं, ताकि हम उसके आगे आत्म समर्पण कर सकें ?

जिसे हम दिव्य इष्ट द्वारा प्रेरित अंतर्ज्ञान म ान लें, हो सकता है वह वास्तव में, हमारा अपने आप से ही बोलना हो, दूसरे भेष में। और हम इस तथाकथित अंतर्ज्ञान को समर्पण कर सकते हैं, यानि अपने 'स्वयं' या अपने 'अहम्' को समर्पण कर सकते हैं। पर यदि हमने एक सच्चा सत्गुरु (जो प्रभु से जुड़ा है और उसका प्रवक्ता है) पा लिया है और हम उसकी हर बात का पालन करें, तो वह अवश्य ही हमारे अहंकार को नष्ट कर देगा और हम एक दिन उसके अलौकिक घर पहुँच जाएँगे ।

३९. इस संसार में कठिनाइयाँ अक्सर आती रहती हैं। पर अनुशासित नामलेवा, इन छोटी-छोटी बातों को सही समझ से और ऊँचे नजरिये से देखने लायक होते हैं और वे इनको क्षण भंगुर मानकर अपना मानसिक संतुलन बनाए रखते हैं। कमजोर मन वाले इंसान इनसे विचलित हो जाते हैं और अपने संबंधों को और खराब कर लेते हैं, जबकि जो लोग इस मतभेद के मूल कारण को समझते हैं, वे इन घटनाओं को नजरअंदाज कर देते हैं। आपको अपनी कठियाईयों को बढ़ाने की जरूरत नहीं, बल्कि आप (क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

मला लहानपणी सांगितलेल्या गोष्टींवर विश्वास ठेवतच मी आतापर्यंतच माझं आयुष्य जगत आलो... त्यालाच मी खरं मानत होतो... आजपासून मी बदलत आहे... मला माझ्याकडे तटस्थ भूमिकेतून बघायचं आहे... मी स्वत:ची प्रतिमा कशी बनवली आहे हे मी पाहतो... मला हे चित्र बदलायचं आहे का... चित्र बदलण्यासाठी मी रंग बदलत आहे... मी कौतुकाचे आणि प्रोत्साहनाचे रंग वापरत आहे... आजपासून मी फक्त स्वत:ची किंमत करणारे, प्रशंसायुक्त विचार निर्माण करणार आहे... माझ्याम ध्ये खूप गुण आहेत... माझ्या गुणांच्या रंगांची निवड मी करतो आणि स्वतःला सहजतेने दिशा देतो... मी स्वत:शी काळजीपूर्वक बोलतो... फक्त शुद्ध आणि शक्तिशाली शब्दांची निवड करतो... मी, आत्मरूपात स्वतःला सशक्त बनवतो... मी स्वत:वर प्रेम करतो आणि जे करणं शक्य आहे ते सगळं करतो... ओम शांती !

### प्रतीमा कशी बनवावी

चिरंतन प्रेमाकडे घेऊन जाण्याचे मंत्र

आपण इतरांना कमी भेटत असलो तरीही आपण सातत्याने स्वतःच्या संपर्कात असतो. आपण स्वतःबाबत जसा विचार करतो तीच आपली विचार करण्याची सवय बनते. आपले विचार त्या ऊर्जाक्षेत्रासारखे आहेत जे आपण आपल्या बरोबर एखाद्या अत्तरासारखे घेऊन फिरतो. आपले शब्द आणि आपलं वागणं लोकांपर्यंत पोहोचायच्या आधीच ते आपले तरंग ग्रहण करतात.

पालक आपल्या मुलांबद्दल जे बोलतात तीच त्या मुलाची स्वतःबाबतची ओळख बनते. कोणत्याही निर्मितीसाठी, नवीन गोष्टी करण्यासाठी मुलं पालकांचा सल्ला अमलात आणतात. स्वत:वर टीका केल्याने आपली ऊर्जा कमी होते. चला, स्वत:चं कौतुक करू या आणि स्वतःला प्रेरित करू या. तेव्हाच आपल्याला स्वतःची नवीन सकारात्मक प्रतिमा निर्माण करता येईल.

सुरेश ओबेरॉय : असं म्हटलं जातं की, तुम्ही कधीकधी स्वतःशी जसं बोलता तसं तुमच्याशी बोलणारा एखादा मित्र तुम्हाला मिळाला तर तुमची मैत्री किती दिवस टिकेल ?

शिवानीदीदी : आपली प्रशंसा करणारे, आपल्याला प्रेरणा देणारे, प्रोत्साहन देणारे आणि गुणदोषांसह स्वीकारणारे मित्र आपल्याला आवडतात. आपल्यावर टीका करणाऱ्यांशी किंवा आपली शक्ती कमी करणाऱ्यांशी आपण जास्त काळ मित्रत्वाने राहू शकत नाही.

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

मुलगा : तु मला ब्लॉक का केले?
मुलगी : तू मला काळी का बोललास
मुलगा : ब्लॉक करुन काय गोरी झालीस का...?

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* कोणते राज्य प्रधानमंत्री उद्योग योजनेच्या अंमलबजावणीत २ ऱ्या क्रमांकावर आहे? – बिहार

– **अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद – आरोग्य संवर्धन

## चिक्कू

चिकू हे मधुर, श्रमहारक, तृप्तीदायक, दाहनाशक असल्याने श्रम करून थकवा आलेल्यांना चिकू खाल्ल्याने नवी ऊर्जा मिळते. चिकू, शीतल व दाहशामक असल्याने अरुची मळमळ आम्लपित्त, अतिसार या आजारांमध्ये उपयुक्त आहे.

चिकू खाल्ल्याने आतड्यांची कार्यक्षमता वाढून ती सुदृढ बनतात. चिकूच्या झाडातून चिकल नावाचा डिंक बाहेर निघतो, तसेच त्याच्या सालीमधून चिकट दुधी रंगाचा रसचिकल नावाचा डिंक काढण्यात येतो. या डिंकामधूनच च्युईंगम बनविण्यात येतो. तसेच या डिंकाचा वस्तू एकमेकांना चिकटविण्यासाठीही उपयोग होतो. गर्भवती स्त्रीने सकाळी उठल्याबरोबर चूळ भरल्यानंतर रोज एक चिकू खावा. रात्रभर उपाशी राहिल्याने सकाळी येणारी चक्कर, तसेच उलटी, मळमळ ही लक्षणे चिकू खाल्ल्याने कमी होतात व फलशर्करा मिळाल्यामुळे उत्साह निर्माण होतो.

रक्तदाब कमी असणाऱ्या व्यक्तींनी चिकू खाल्ल्यास रक्तदाब प्राकृत होतो.

ज्यांना वारंवार चक्कर येण्याचा त्रास होत असेल, तसेच काहींची शरीरातील साखर वारंवार कमी होत असेल, लो शुगरचा त्रास असणाऱ्या व्यक्तींनी चहा, बिस्किटे खाण्याऐवजी चिकू खावा या चिकूमधील नैसर्गिक फलशर्करा लगेचच रक्तात शोषली जाऊन चक्कर, थकवा, ग्लानी ही लक्षणे कमी होतात. ताप आलेल्या रुग्णांचे जर तोंड बेचव झाले असेल तर चिकू खावा. त्याने तोंडास रुची निर्माण होऊन उत्साह निर्माण होतो.

चिकूच्या सालीचा काढा अतिसार व ताप यामध्ये दिल्यास जुलाब व ताप ही लक्षणे कमी होतात. कारण चिकूच्या सालीमध्ये टॅनिन हा घटक असतो आणि हा घटक शक्तिवर्धक व तापनाशक आहे. चिकू सात-आठ तास लोण्यामध्ये भिजवून खाल्ल्यास शरीरामधील दाह, डोळ्यांची, हातपायांची जळजळ, आम्लपित्त ही पित्तप्रकोपक लक्षणे कमी होतात. चिकूमध्ये असणाऱ्या आर्द्रता व तंतुमय पदार्थांमुळे मलावरोध असणाऱ्या रुग्णांनी रात्री झोपताना व सकाळी उठल्याबरोबर चिकू खाल्ल्यास शौचास साफ होते.

सावधानता : कच्चे चिकू खाऊ नयेत, कारण हे चिकू बेचव असतात व त्यामधील चिकामुळे तोंड कोरडे पडते, तसेच मलावरोध व पोटात दुखणे या तक्रारी दिसून येतात. पिकलेला चिकू स्वच्छ धुऊन खावा. मधुमेह असणाऱ्या रुग्णांनी सहसा चिकू खाऊ नये.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं– ८७९३४००४००

# भारतातील वृध्दाश्रम आणि अनाथालय पूर्णपणे बंद झाल्यावरच भारत विश्व गुरू होईल : इंद्रेश उपाध्याय

नगर – आपल्या भारत देशामधील वृध्दाश्रम आणि अनाथालय पूर्णपणे बंद झाल्यावरच भारत विश्व गुरू होईल, असे प्रतिपादन इंद्रेश उपाध्याय यांनी केले.

येथील श्रीमती कौशल्यादेवी गौरीशंकर गुप्ता, महेश गुप्ता आणि आयुष गुप्ता यांनी सावेडी मधील मिस्कीन मळ्यात आयोजित केलेल्या श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे व्दितीय पुष्प गुंफताना ते बोलत होते. सुधीर झालानी, किसनलाल बंग, प्रदिप पंजाबी यांच्यासह भाविक सोहळ्याचा आनंद मिळवून देण्यासाठी अथक परिश्रम घेताना दिसत आहेत.



सावेडी मधील मिस्कीन मळ्यात आयोजित केलेल्या श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे व्दितीय पुष्प गुंफताना इंद्रेश उपाध्याय. कार्यक्रमासाठी भाविकांची झालेली गर्दी. (छाया : राजेंद्र बुलबुले)

इंद्रेश उपाध्याय पुढे म्हणाले, आई-वडिलांची सेवा करताना प्रत्यक्ष पांडुरंग आले तरी सेवेत खंड पडू न देता भक्त पुंडलिकाने पांडुरंगाला थांबायला सांगितले. आई-वडिलांच्या सेवेने भगवंत प्रसन्न होतो, हे पुंडलिकाने दाखवून दिले तरीही करिअरच्या नावाखाली आई-वडिलांना वृध्दाश्रमात ठेवणारी मुलं आहेतच! बाळ जन्माला आल्यावर त्याला अनाथालयात पोहोचवणारे माता-पिता आहेतच! ही वस्तुस्थिती मनाला प्रचंड वेदना देणारी आहे.

आपली वाणी, बुद्धी अपवित्र होऊ शकते. मात्र आत्मा सदैव पवित्र असतो. भगवंताच्या कथा ऐकताना मन तल्लीन होऊ लागले तर समजावे भगवान श्रीकृष्ण प्रसन्न होणार आहेत. श्रीकृष्णांचा प्रभाव सगळ्यांना जाणवतो. भक्तांचा भाव पाहून भगवंत प्रसन्न होतात. आपले शारीरिक, बौद्धिक, मानसिक, पारिवारिक ताप कथा श्रवणाने निघून जातात. शरिरातील रोम-रोम पुलकित होतो. आपल्या शरीरात रक्त नव्हे तर कृष्ण नावाची धारा वाहते, असे वाटते. श्रीकृष्णांचे नामामृत पिल्यावर साक्षात श्रीकृष्णाची भेट होतेच, असा विश्वास इंद्रेश उपाध्याय यांनी व्यक्त केला.

ते पुढे म्हणाले, भगवान श्रीकृष्णाची प्रेमयुक्त, श्रध्दायुक्त भक्ती करा. निस्वार्थ भावनेने केलेली भक्ती भगवंतापर्यंत पोहोचवते. आपले मन, चित्त, वृत्ती, कान, डोळे असे सर्वच शरीर एकाग्र होऊ लागले की, आपण भगवंताजवळ पोहोचू लागलो आहोत, हे लक्षात घ्या.

ज्यांना मुगल बादशहा थरथर कापत होते त्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या डोळ्यातून सत्संगात अश्रू ओघळत. गोकुळातील गोपी संसार विसरत. पंढरपूरात संत नामदेवांच्या संकीर्तनात प्रत्यक्ष विठ्ठल नाचत. माया म्हणजे संसार आणि परमात्मा म्हणजे भक्ती हे दोन्हीही वेगवेगळे आहे हे लक्षात घेऊन डोळे मिटले की, डोळ्यांसमोर पंढरीनाथ उभे रहातात, असे इंद्रेश उपाध्याय यांनी सांगितले. भज रे हरी का नाम या सुमधुर भक्तीगाताने सर्वांना हरिनामात तल्लीन होण्याचा आनंद मिळवून दिला.

# प्रेरणादायी अक्षरधन

## तोचि ज्ञान हे बोलता

"मुसाफिर" वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षरधन
संकलन: दिशान फिचर्स

समाज मनाला सुखावणारी चैतन्य पालवी
डॉ. रामचंद्र देखणे
'चपराक' प्रकाशित ललित चिंतन

दृश्याचा सर्वार्थाने शोध घेणे हे विज्ञान तर दृश्याला दृश्यरूप देणाऱ्या अदृश्याचा शोध घेणे हे ज्ञान आणि त्या शोधाची प्रक्रिया किंवा रीत म्हणजे अध्यात्म होय. परमात्मा म्हणून अशी बाब आहे, ती ज्ञानाशिवाय इतर कशानेही समजत नाही आणि अनुभवायला येत नाही. ज्ञानदेव म्हणतात...

तरी परमात्मा ऐसे।
जे एक वस्तू असे।
ते जया दिसे।
ज्ञानास्तव
(ज्ञानेश्वरी १३-६१५)

परमात्मा जर फक्त ज्ञानाने अनुभवता येतो मग तो भक्तिने अनुभवता येत नाही का? असा प्रश्न उभा राहील. ज्ञान म्हणजे आत्मज्ञान ते तर भक्ताच्या ठायी ओतप्रोत भरलेले असते. म्हणून तर भक्त जगातील सर्वांच्या ठायी वासुदेवत्वाने पाहत असतो.

हे समस्तहि श्रीवासुदेवो ।
ऐसा प्रतितीरसाचा ओतला भावो ।
म्हणौनि भक्तामाजी रावो ।
आणि ज्ञानिया तोचि ।

असा समभावाचे दर्शन घेणारा तो भक्तामधला राजा असतो आणि ज्ञानीही असतो. भक्त हा ज्ञानी असतोच कारण जे केल्याने परमात्मा भेटेल, अशी भक्ती तो अनुसरत असतो. महाभारताच्या युद्धात दहाव्या दिवशी शिखंडीला पुढे करून अर्जुनाने भीष्माचार्यांवर बाणांचा वर्षाव केला. सूर्य जाताना ते रथातून कोसळले आणि बाणांच्या टोकावर देह ठेवून शरपंजरी पडले. तसेच उत्तरायणाची वाट पाहत छप्पन्न दिवस थांबले. 'माझ्या अंगावर येणारे बाण इतक्या ताकतीने, शक्तिने आणि कौशल्याने येत होते की असे बाण अर्जुनाशिवाय कोण मारू शकणार ? पण त्याच्या बाणांनी मी विद्ध झालो याचा मला आनंद आहे', असे उद्गार शरपंजरी भीष्माचार्यांनी काढले. बाणाच्या टोकावर देह ठेवला. डोक्याखाली काही नव्हते. कुणीतरी मखमली उशी आणली. त्या उशीकडे पाहताच भीष्मांनी नाराजी व्यक्त केली. तेवढ्यात अर्जुनाने कुशलतेने तीन बाण सोडले की ते तीन बाण भिष्माचार्यांच्या खाली जाऊन बसले आणि त्यावर त्यांनी मान टेकवली. जसे अर्जुनाच्या कृतीतूनच त्याचा पुरुषार्थ कळत होता. तसेच

तोचि ज्ञान हे बोलता ।
कवण पंडुसुता ।
ज्ञानेश्वरी १३-६३२

त्याच्या बोलण्यातून ज्ञानी ओळखता येतो, यात आश्चर्य कसले?

– किशोर गांधी

# काळ भैरवनाथ मंदिर जीर्णोद्धार सोहळा माळीवाडा येथे उत्साहात

नगर – माळीवाडा ब्राह्मण गल्ली येथील श्री काळ भैरवनाथ मंदिराचा जीर्णोद्धार व मूर्ती स्थापनेचा सोहळा १२ एप्रिल रोजी भक्तिमय वातावरणात उत्साहात झाला. यानिमित्त वरद गणेश लकशेट्टी यांनी मंदिरासाठी स्टीलचा दरवाजा अर्पण केला.



यावेळी मंदिराचे अध्यक्ष चरण परदेशी, उपाध्यक्ष मिलिंद काका लकशेट्टी यांच्यासह दत्ता लकशेट्टी, सुनील जैन, धनंजय कळमकर, रोहित कावळे, भाऊ उरणे, अमोल लकशेट्टी, सतीश तांबोळी, तुषार वाघ, विशाल जाधव, संतोष नन्नवरे, अमोल ठाकूर, महेश चिंतामणी, कचरू परदेशी, महेंद्र लकशेट्टी, सागर कापसे, गणेश चिंतामणी, विनीत कावळे, गौरव बुगे, अमित डोळसे, साजिद शेख, रोहित सोनेकर, संतोष लकशेट्टी, चातुर परदेशी आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी अध्यक्ष चरण परदेशी व उपाध्यक्ष मिलिंद काका लकशेट्टी यांनी वरद लकशेट्टी यांचे मंदिरास दरवाजा अर्पण केल्याबद्दल आभार मानले.

# 'गोदा ते नर्मदा' पुण्यश्लोक अहिल्यादेवी जलयात्रा २०२६ उपक्रमाचा शुभारंभ त्र्यंबकेश्वर आणि चोंडी येथून होणार

## अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंती निमित्त आयोजन

मुंबई – गोदा ते नर्मदा या पुण्यश्लोक अहिल्यादेवी जलयात्रा २०२६ चा शुभारंभ त्र्यंबकेश्वर आणि चोंडी येथून कार्यक्रमाद्वारे केला जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त त्यांचे कार्य, विचार व वारसा नागरिकांपर्यंत पोहचविण्यासाठी २५ ते २९ एप्रिल या कालावधीत या जलयात्रेचे आयोजन करण्यात येणार आहे.



गोदा ते नर्मदा या जलयात्रेबाबत मंत्रालयात सादरीकरण करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी जलसंपदा मंत्री (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) राधाकृष्ण विखे पाटील, जलसंपदा (विदर्भ, तापी,कोकण पाटबंधारे विकास महामंडळ) व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा, जलसंपदा लाभक्षेत्र विकास सचिव संजय बेलसरे, जलसंपदा विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, अहिल्यादेवींची जन्मभूमी चोंडी महाराष्ट्रात असून त्यांचा प्रभावी सांस्कृतिक वारसा महाराष्ट्राशी जोडलेला आहे. अहिल्यादेवींच्या कार्यातील सुशासन, महिला नेतृत्व, लोककल्याण, जलदृष्टी, वारसा संवर्धन यासाठी राष्ट्रीय मूल्ये महत्त्वपूर्ण आहे. राज्य शासनाकडून त्याचे स्मरण करताना हा उपक्रम या जलयात्रेच्या निमित्ताने राबविला जाणार आहे.

२५ एप्रिल रोजी अहिल्यादेवींचे जन्मगाव चोंडी आणि नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर येथून यात्रांचा शुभारंभ होईल आणि या यात्रांचा संगम शिर्डी येथे होणार असून तेथून छत्रपती संभाजी नगर घृष्णेश्वर, धुळे या मार्गाने इंदूर येथे २९ एप्रिल रोजी समारोप होईल. या जलयात्रेदरम्यान विविध कार्यक्रम व उपक्रम जलयात्रेच्या मार्गावरील गावांमध्ये आणि शहरात होणार आहेत.

### पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या जलदृष्टीचा गौरव

लघु कालव्यांचे जाळे उभारणे, पाणी साठवण आणि जलसंवर्धन, शेतीपूरक विकास, स्थानिक रोजगार आणि कुटीर उद्योगांना चालना हे अहिल्यादेवींचे जलसंवर्धनातील कार्य प्रेरणास्त्रोत आहे. अहिल्यादेवींनी हे तत्त्व २५०-३०० वर्षांपूर्वी आचरणात आणले होते. अहिल्यादेवींनी गरीब, वंचित, शेतकरी आणि सामान्य जनतेला केंद्रस्थानी ठेवून शासन केले.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी अहिल्यादेवींच्या कार्याचा गौरव केला असून या कालावधीत विविध उपक्रम देशभरात आयोजित करण्यात आले आहेत.

स्मारक नाणे व टपाल तिकीट प्रकाशन.,महिला सक्षमीकरण, सुशासन व वारसा संवर्धनाशी निगडित उपक्रम., प्रदर्शने, प्रकाशने, परिसंवाद, सांस्कृतिक कार्यक्रम., विविध राज्ये, संस्था यांच्यावतीने विविध कार्यक्रम राष्ट्रीय स्तरावर आयोजन केले गेले आहे.

# भाई सथ्था नाईट हायस्कूलमध्ये शिक्षण प्रसार जनजागृती अभियानाचा शुभारंभ महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त उपक्रम; अर्धवट शिक्षण सोडलेल्यांना नवी संधी

## 'विद्येविना मती गेली' हा संदेश केवळ काव्य नसून, प्रगतीचा मूलमंत्र : डॉ. पारस कोठारी

नगर – शहरातील हिंद सेवा मंडळाच्या भाई सथ्था नाईट हायस्कूलमध्ये महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी विशेष जनजागृती अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. या अभियानाच्या माध्यमातून विविध कारणांनी अर्धवट शिक्षण सोडलेल्या विद्यार्थ्यांना पुन्हा शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचा महत्त्वाकांक्षी उपक्रम राबवण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत रात्र शाळेत पुन्हा प्रवेश देण्यावर भर देण्यात येणार असून, आजी-माजी विद्यार्थी व शिक्षक 'शिक्षणदूत' म्हणून सक्रिय भूमिका बजावणार आहेत. समाजातील उपेक्षित व शिक्षणापासून वंचित घटकांपर्यंत पोहोचून त्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे.



कार्यक्रमाची सुरुवात महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. हा मान रात्र शाळेच्या चेअरमन ज्योतीताई कुलकर्णी व पेमराज सारडा कनिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन डॉ. पारस कोठारी यांच्या हस्ते पार पडला. यावेळी प्राचार्य सुनिल सुसरे, महादेव राऊत, अमोल कदम, उज्वला साठे, वृषाली, साताळकर, अनुराधा दरेकर, वैशाली दुराफे, बाळासाहेब गोरडे, शिवा शिंदे, कैलास करांडे, गजेंद्र गाडगीळ, मंगेश भुते, अशोक शिंदे, प्रशांत शिंदे, स्वाती होले, अनिरुद्ध देशमुख, अनिरुद्ध कुलकर्णी, संदीप कुलकर्णी, अविनाश गवळी, मनोज कोंडेजकर, कैलास बालटे आदी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

या कार्यक्रमात महाराष्ट्र शासनाचा क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षिका स्वाती किशोर अहिरे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. त्या अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाच्या श्री नवनाथ विद्यालय, करंजी (ता. पाथर्डी) येथे कार्यरत आहेत.

ज्योतीताई कुलकर्णी म्हणाल्या की, पूर्वी महिला घरात कोंडलेली बाहुली होती. महात्मा फुले यांनी तिला शिक्षणाच्या माध्यमातून समाजात सन्मान मिळवून दिला. महिलांवर लादलेल्या अन्यायकारक रुढी आणि परंपरा त्यांनी शिक्षणाच्या बळावर दूर केल्या. स्वतःच्या पत्नीला सुशिक्षित करून त्यांनी स्त्री शिक्षणाची पायाभरणी केली. 'स्त्री शिकली तर समाज घडतो' हे त्यांनी आपल्या कार्यातून सिद्ध केले. ज्योतिबांचे ऋण कधीही फेडता येणार नसल्याचे त्या म्हणाल्या.

डॉ. पारस कोठारी म्हणाले की, महात्मा फुले यांनी शिक्षणाच्या माध्यमातून समाजमनातील अंधकार दूर केला. त्यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षाचा प्रारंभ हा ज्ञान, समता आणि मानवी हक्कांच्या लढ्याला मिळालेले मोठे यश आहे. 'विद्येविना मती गेली' हा त्यांचा संदेश केवळ काव्य नसून प्रगतीचा मूलमंत्र आहे. हिंद सेवा मंडळ त्यांच्या विचारांवर चालत असून, नाईट हायस्कूलच्या माध्यमातून समाजातील उपेक्षित घटकांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देत आहे. शिक्षण देऊनच थांबणार नाही, तर त्यांना समाजात सक्षमपणे उभे करण्याचे कामही केले जात आहे.

जिल्हा परिषद शिक्षण विभाग व महानगरपालिका शिक्षण मंडळ यांच्या मार्गदर्शनाने गेली दोन वर्ष सतत या अभियानांतर्गत तीन गटांमध्ये स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे: पहिला गट: शिक्षणदूत म्हणून जबाबदारी स्वीकारलेल्या आजी माजी विद्यार्थी, दुसरा गट: वर्गशिक्षकांचा, जे आपल्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून जास्तीत जास्त प्रवेश मिळवून देतील, तिसरा गट: शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, जे वैयक्तिक संपर्कातून जनजागृती करतील. या तिन्ही गटांमधून रात्रशाळेत सर्वाधिक परिपूर्ण प्रवेश मिळवून देणाऱ्या पहिल्या तीन क्रमांकाच्या व्यक्तींना ट्रॉफी व सन्मानपत्र देण्यात येणार आहे व या स्पर्धेदरम्यान समाजातील सामाजिक कार्यकर्ते, शिक्षक, वकील हे देखील सामाजिक जबाबदारी स्वीकारून शिक्षण प्रसार जनजागृती अभियान अंतर्गत रात्रशाळेत गरजवंत विद्यार्थ्यांचा किमान एक प्रवेश करणाऱ्यांना सन्मानपत्र देण्यात येणार असल्याची माहिती प्राचार्य सुनिल सुसरे यांनी दिली. विशेष शालेय शिक्षण विभागाने रात्र शाळेतील इयत्ता अकरावी प्रवेश ऑफलाइन पद्धतीने ठेवल्याने गरजवंतांनी तात्काळ आपला प्रवेश निश्चित करण्याचे म्हटले आहे.

या उपक्रमाचे संस्थेचे अध्यक्ष अध्यक्ष प्रा. शिरीष मोडक, कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी, मानद सचिव संजय जोशी, ज्येष्ठ मार्गदर्शक ब्रिजलाल सारडा, अजित बोरा, अनंत फडणीस, डॉ. रमेश झरकर आदींनी उपक्रमाचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शरद पवार यांनी केले. गजेंद्र गाडगीळ यांनी आभार मानले.

# अहिल्यादेवी होळकर जयंती उत्सवात 'कर्तृत्ववान व्यक्तींचा' होणार गौरव

## पुरस्कारासाठी १५ मे पर्यंत प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन

नगर – जय मल्हार शैक्षणिक आणि बहुउद्देशीय सामाजिक संस्था व यशवंत सेना अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती उत्सवाचे आयोजन करण्यात येणार आहे. समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींना या सोहळ्यात राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात येणार असल्याची माहिती संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कांतीलाल जाडकर यांनी दिली आहे. या जयंती उत्सवानिमित्त सामाजिक, शैक्षणिक, शिक्षक, सांस्कृतिक, कृषी, सहकार, उद्योग, वैद्यकीय, प्रशासकीय तसेच पत्रकारिता अशा विविध क्षेत्रांमध्ये मोलाचे योगदान देणाऱ्या महाराष्ट्रातील मान्यवर व्यक्तींना सन्मानित करण्यात येणार आहे. समाजकारण आणि लोककल्याणाच्या कार्याला चालना देण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात येत असल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले आहे.

या सोहळ्यात 'लोकमाता अहिल्यादेवी होळकर जीवन गौरव पुरस्कार', 'युवा गौरव पुरस्कार', 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर जीवन गौरव पुरस्कार', 'रणरागिणी पुरस्कार', 'छत्रपती शिवाजी महाराज जीवनगौरव पुरस्कार', 'महाराष्ट्र भूषण' तसेच 'समाज भूषण' असे विविध पुरस्कार प्रदान केले जाणार आहेत. या सर्व पुरस्कारांचे स्वरूप सन्मानचिन्ह व मानपत्र असे असणार आहे.

समाजातील कार्यकर्ते, संस्था, नागरिक तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी योग्य उमेदवारांचे प्रस्ताव पाठवावेत, असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे. इच्छुकांनी संबंधित व्यक्तीची माहिती, कार्याचा तपशील आणि आवश्यक कागदपत्रे पीडीएफ स्वरूपात तयार करून १५ मे पर्यंत ८८०५९२२९६० या क्रमांकावर व्हॉट्सपद्वारे व कांतीलाल महादेव जाडकर रो बंगला नं.१, ओंकारनगर (पाण्याच्या टाकीजवळ), केडगाव (देवी) अहिल्यानगर ४१४००३, या पत्यावर पाठवावीत, असे सांगण्यात आले आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती उत्सवाची नेमकी तारीख व कार्यक्रमाचे सविस्तर वेळापत्रक लवकरच जाहीर करण्यात येणार असल्याचे आयोजकांनी नमूद केले आहे. समाजहितासाठी कार्य करणाऱ्या व्यक्तींना प्रोत्साहन देत त्यांच्या कार्याची दखल घेण्याच्या उद्देशाने हा सन्मान सोहळा उत्साहात पार पडणार आहे.

# जळालेल्या व भाजलेल्या रुग्णांसाठी मोफत प्लास्टिक शिबिराचे आयोजन

नगर – बेंगळुरू येथे जळालेल्या व भाजलेल्या रुग्णांसाठी मोफत प्लास्टिक सर्जरी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. गॅस स्फोट, सिड हल्ले, घरगुती स्फोट, विजेचा धक्का तसेच इतर अपघातांमध्ये भाजलेल्या रुग्णांच्या जीवनात नवसंजीवनी देण्यासाठी रोटाप्लास्ट इंटरनॅशनल (अमेरिका) या संस्थेमार्फत तज्ञ डॉक्टरांची टीम या शिबिरात मोफत शस्त्रक्रिया करणार आहे, अशी माहिती भारतीय जैन संघटनेचे शशिकांत मुनोत यांनी दिली.

बेंगळुरू येथील फ्रेंडस् वेल्फेअर फौंडेशन या संस्थेमार्फत मागील २९ वर्षांपासून अशा शिबिरांचे यशस्वी आयोजन केले जात आहे. आतापर्यंत ४५०० हून अधिक रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत. सदर शिबिरजैन हॉस्पिटल, गिरिनगर, ६ क्रॉस अवलाहल्ली, बेंगळुरू येथे आयोजित करण्यात येणार आहे. एप्रिल महिन्यात प्राथमिक नोंदणी करण्यात येईल. ११ मे रोजी तपासणी होईल आणि निवडलेल्या रुग्णांवर १२ ते २१ मे दरम्यान मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत. हे शिबिर पूर्णपणे मोफत असून रुग्ण व त्यांच्या एका सहकाऱ्यासाठी प्रवास, तपासण्या, शस्त्रक्रिया, शस्त्रक्रियेनंतर राहण्याची व्यवस्था, भोजन व औषधे यांची संपूर्ण सुविधा आयोजकांकडून उपलब्ध करून दिली जाणार आहे. सामान्य लोकांच्या आवाक्याबाहेर असलेल्या या उपचारांचा लाभ रुग्णांनी घ्यावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. नोंदणीसाठी संपर्क : ९१४८७४१७०७ / ९८८०३०७७८०

# गुणे आयुर्वेद महाविद्यालयात सामाजिक समरसता सप्ताहाचा प्रबोधनात्मक उपक्रमांनी समारोप

नगर – गंगाधरशास्त्री गुणे आयुर्वेद रुग्णालय व महाविद्यालयात महात्मा ज्योतिबा फुले व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक समता सप्ताहाचे आयोजन करण्यात आले. यानिमित्ताने विविध प्रबोधनात्मक उपक्रम महाविद्यालयात राबवण्यात आले. या सप्ताहाचा समारोप माजी प्राध्यापक अर्जुन कांबळे व न्यूआर्ट्स महाविद्यालयाचे प्रा.बापू चंदनशिवे यांच्या व्याख्यानाने झाला. महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन उपस्थितांनी केले. यावेळी आयुर्वेद शास्त्र सेवा मंडळाचे संचालक ज्ञानदेव पांडुळे, ज्ञानेश्वर रासकर, वैशाली ससे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दत्तात्रेय लोडे, उपप्राचार्य डॉ. सुरजसिंग ठाकूर यांच्यासह प्राध्यापक, विद्यार्थी व कर्मचारी उपस्थित होते.



गुणे आयुर्वेद रुग्णालय व महाविद्यालयात आयोजित सामाजिक समता सप्ताहाच्य समारोप प्रसंगी महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन करताना माजी प्राध्यापक अर्जुन कांबळे व प्रा.बापू चंदनशिवे.

प्रा.बापू चंदनशिवे यांनी मनोगतातून देशाच्या जडणघडणीमध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या योगदानावर प्रकाश टाकला. तसेच सामाजिक व मानवतावादी दृष्टिकोन विषयी विचार मांडून दलित व दलितेतर वर्ग, महिला, शेतकरी, कष्टकरी वर्ग यांच्या उद्धारासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य अधोरेखित केले.

प्रा.अर्जुन कांबळे म्हणाले, महात्मा ज्योतिबा फुले व भारतरत्न बाबासाहेब आंबेडकर या दोन महान व्यक्तिमत्त्वांचे कार्य समजून घेऊन ते आत्मसात करणे हीच त्यांची खऱ्या अर्थाने जयंतीनिमित्त आदरांजली ठरेल. या दोन्ही महापुरुषांमुळे समाज व शिक्षणाची व्यवस्थेची घडी बसली आहे, असे सांगून महात्मा फुले व बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील विविध संघर्ष में प्रसंगांचे वर्णन त्यांनी केले.

प्रास्ताविकात ज्ञानदेव पांडुळे म्हणाले, महात्मा ज्योतिबा फुले यांनी समतेचा पाया रोवून प्रतिकूल परिस्थितीवर मात करूत सत्यशोधक समाजाची स्थापना करून बंधुभाव प्रस्थापित केला. या महापुरुषांच्या जयंतीनिमित्त आयुर्वेद महाविद्यालयात झालेल्या सामाजिक समता सप्ताहाच्या माध्यमातून महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा व कार्याचा जागर झाला आहे.

कार्यक्रमाचे संयोजन प्रा.डॉ.वानखडे. प्रा.डॉ.अमित शिंगारे, प्रा.डॉ.अंजली देशमुख, प्रा.डॉ.उत्क्रांती सलगरे, प्रा.डॉ.प्रवीण जोशी व प्रा.डॉ.रूपाली म्हसे आदींनी केले.



'समर्थ'च्या विद्यार्थ्यांनी आंतरराष्ट्रीय मानव अंतराळ उड्डाण दिवस साजरा केला.

# 'समर्थ'च्या विद्यार्थ्यांनी साजरा केला आंतरराष्ट्रीय मानव अंतराळ उड्डाण दिवस

## अमेरिकेच्या नासाच्या वतीने विद्यार्थ्यांना प्राप्त झाले बोर्डिंग पास व पासपोर्ट

नगर – १२ एप्रिल १९६१ रोजी सोव्हिएत–रशियन अंतराळवीर युरी गागारिन यांनी 'व्होस्टोक १' या अंतराळयानातून पृथ्वीची पहिली प्रदक्षिणा पूर्ण केली होती. तसेच भारताच्या इस्त्रोच्या गगनयान या पहिल्या मानवी अंतराळ मोहिमेची दुसरी एकात्मिक हवाई चाचणी नुकतीच १० एप्रिल रोजी यशस्वी झाली तसेच नासाच्या आर्टीमिस–२ या उपक्रमाचे प्रक्षेपण व समुद्रातून पृथ्वीवरील पुनरागमन, तसेच इस्त्रोच्या गगनयानच्या मॉड्युल चाचणीचे लाईव्ह प्रात्यक्षिक शेकडो विद्यार्थ्यांनी ऑनलाइन अनुभवले. नासाच्या उपक्रमाचे बोर्डिंग पास व पासपोर्ट विद्यार्थ्यांना प्राप्त झाले.

हे औचित्य साधत सावेडीच्या श्री समर्थ विद्या मंदिर प्रशाला, माध्यमिक विभागाच्या वतीने संयुक्त राष्ट्र महासभेच्या वतीने निर्धारित आंतरराष्ट्रीय मानव अंतराळ उड्डाण दिवस साजरा करण्यात आला. याकामी स्पेस एज्युकेटर शिक्षक डॉ.अमोल बागुल यांनी विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन करत परिश्रम घेतले.

याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाचे सचिव सुरेश क्षीरसागर, प्राचार्या वसुधा जोशी आदी उपस्थित होते. शालेय समिती चेअरमन ॲड. किशोर देशपांडे यांचे विशेष मार्गदर्शन या उपक्रमाला लाभले. २ ते १२ एप्रिल या कालावधीतील नासाच्या आर्टीमिस–२ या ४ अंतराळवीरांच्या चांद्र मोहिमेच्या १० दिवसांचा प्रवास विद्यार्थ्यांना ऑनलाइन दाखवण्यात आला. विद्यार्थ्यांच्या विविध शंकांचे निरसन करण्यात आले.

श्री.क्षीरसागर यांनी नमूद केले की विद्यार्थ्यांच्या मनामध्ये मानवजातीच्या अंतराळ युगाच्या सुरुवातीचे स्मरण करणे,शाश्वत विकासाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी अंतराळ विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या योगदानाचा गौरव करणे आणि शांततापूर्ण हेतूंसाठी बाह्य अवकाशाचा वापर करण्याच्या प्रयत्नांना प्रोत्साहन देणे. यासाठी हा उपक्रम विशेष महत्त्वाचा वाटतो.

विज्ञान शिक्षिका सौ.द्वारका खिलारी यांच्या प्रयत्नातून विद्यार्थ्यांनी सूर्यमालेची विविध शेकडो स्वयंचलित शैक्षणिक साहित्य साधने तयार करून उपक्रमात सहभाग घेतला. प्रास्ताविक प्राचार्या जोशी यांनी केले. पर्यवेक्षक लक्ष्मीकांत कुलकर्णी यांनी आभार मानले.

# 'महात्मा फुले राष्ट्रीय सन्मान पुरस्कारा'ने अहिल्यानगरचे जालिंदर बोरुडे सन्मानित



कोल्हापूरचे माजी आमदार ऋतुराज पाटील यांच्या हस्ते जालिंदर बोरुडे यांना महात्मा फुले राष्ट्रीय सन्मान पुरस्कार प्रदान करण्यात आला.

नगर – कोल्हापूर येथील सत्यशोधक प्रागतिक मंच निर्मिती विचार मंचच्या वतीने 'नेत्रदूत' म्हणून ओळख असलेले जालिंदर बोरुडे यांना 'महात्मा फुले राष्ट्रीय सन्मान पुरस्कार–२०२६' प्रदान करण्यात आला. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त राजर्षी शाहू स्मारक भवन, दसरा चौक, कोल्हापूर येथे आयोजित कार्यक्रमात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. कोल्हापूरचे माजी आमदार ऋतुराज पाटील यांच्या हस्ते बोरुडे यांना सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमास कोल्हापूरचे उपमहापौर भुपाल शेटे, मंचाचे अध्यक्ष आदित्य म्हमाने, सचिव अंतिमा कोल्हापूरकर, डॉ. वसंत भागवत, डॉ. मिनल राजहंस, इंजि. अभिजीत कांडेकर, इंजि. यश घोगरे, इंजि. सौरभ बोरुडे उपस्थित होते.

ऋतुराज पाटील म्हणाले की, जालिंदर बोरुडे यांचे कार्य हे समाजासाठी प्रेरणादायी आहे. त्यांनी गेल्या अनेक वर्षांपासून निस्वार्थ भावनेने नेत्रसेवा करत हजारो लोकांना नवजीवन दिले आहे. फिनिक्स सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून त्यांनी केलेले कार्य हे खऱ्या अर्थाने महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे प्रत्यक्ष उदाहरण आहे. समाजातील दुर्बल घटकांसाठी अशा प्रकारे काम करणारे व्यक्तिमत्व अत्यंत दुर्मिळ असल्याचे त्यांनी सांगितले.

कोल्हापूरचे उपमहापौर भुपाल शेटे म्हणाले की, जालिंदर बोरुडे यांचे कार्य हे समाजासाठी दीपस्तंभासारखे आहे. त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन अधिकाधिक युवकांनी सामाजिक कार्यात सहभागी होण्याचे त्यांनी आवाहन केले.



बुरुडगाव रोड येथील शिव संघर्ष मित्र मंडळ, जय शंभो नारायण ग्रुप, श्रीराम चौक व श्रीरामनगर यांच्या संयुक्त विद्यमाने क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांना वह्या–पुस्तकांचे वाटप करून अभिवादन करण्यात आले.

# महात्मा ज्योतिबा फुले जयंतीनिमित्त बुरुडगाव रोडवर वह्या–पुस्तकांचे वाटप

नगर – बुरुडगाव रोड येथील शिव संघर्ष मित्र मंडळ, जय शंभो नारायण ग्रुप, श्रीराम चौक व श्रीरामनगर यांच्या संयुक्त विद्यमाने क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांना वह्या–पुस्तकांचे वाटप करून अभिवादन करण्यात आले. आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. कार्यक्रमात विद्यार्थी, पालक व नागरिक उपस्थित होते.

या कार्यक्रमात राऊत मंडप डेकोरेट्सचे संचालक अतिश राऊत, ऋषिकेश आनंदकर, संतोष राऊत, अनिकेत खंडागळे, ॲड. बाळासाहेब मेहेत्रे, आनंद रांगोळीवाला, गुड्डू राऊत, स्वप्नील राऊत, शिवा पटवेकर, कार्तिक आरडे, अभिषेक आनंदकर, प्रयास आरडे, गणेश मेहेत्रे, अर्जुन गहिले, अक्षय राऊत, विकास खरपुडे आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना वह्या–पुस्तकांचे वाटप करण्यात आले.

# भिंगारमध्ये आरपीआयच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात



रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाच्या वतीने भिंगार येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

नगर – रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाच्या वतीने भिंगार येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला बाबासाहेबांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले व त्यांच्या महान कार्याचा जागर करण्यात आला. शहर पोलिस उपाधीक्षक दिलीप टिपरसे, भिंगार कॅम्प पोलिस स्टेशनचे सहायक पोलिस निरीक्षक जगदीश मुलगिर तसेच आंबेडकरी चळवळीचे अशोक गायकवाड यांच्या हस्ते पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी रिपब्लिकन पक्षाचे युवक जिल्हाध्यक्ष अमित काळे, कॅन्टोन्मेंट बोर्डाचे माजी व्हाईस प्रेसिडेंट सुनिल काळे, रिपाई भिंगार शहराध्यक्ष मंगेश मोकळ, युवक जिल्हा सचिव गौतम कांबळे, शिवसेनेचे शहर प्रमुख सुनिल लालबोंद्रे, भिंगार अर्बन बँकेचे संचालक एकनाथ जाधव, भाजप शहर जिल्हा चिटणीस महेश नामदे, भाजप भिंगार शहराध्यक्ष सचिन जाधव, नगरसेवक रवी लालबोंद्रे, माजी सरपंच युवराज पाखरे, माजी उपसरपंच कैलास पगारे, कॅन्टोन्मेंट बोर्डाचे मनोनित सदस्य वसंत राठोड, रिपाई नेते चंद्रकांत ठोंबे, रिपाई नेते विलास साठे, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष संजय सपकाळ, कॅन्टोन्मेंट बोर्डाचे मा. व्हा. प्रेसिडेंट संभाजी भिंगारदिवे, भाऊ भिंगारदिवे, मच्छिंद्र भिंगारदिवे, जनाभाऊ भिंगारदिवे, संतोष छजलाने, प्रकाश गोहेर, किशोर भगवाने, विक्रम चौहान, अशोक जाधव, भिमराव पगारे, जयंत गायकवाड, अजय पाखरे, प्रमोद जाधव, काँग्रेसचे शामराव वागस्कर, भाजपचे शिवाजी दहीहंडे, प्रकाश लूनिया तसेच इतर उपस्थित होते.

या कार्यक्रमात पोलिस दलात उत्कृष्ट कार्य करून गुन्हेगारी रोखण्यात मोलाची भूमिका बजावणारे पोलिस उपाधीक्षक दिलीप टिपरसे व सहायक पोलिस निरीक्षक जगदीश मुलगिर यांचा विशेष सन्मान करण्यात आला. तसेच आंबेडकरी चळवळीत सातत्याने योगदान देणारे अशोक गायकवाड यांचाही गौरव करण्यात आला.

अशोक गायकवाड म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या विचारांमुळे समाजातील वंचित, शोषित घटकांना न्याय मिळाला. त्यांचे कार्य हे केवळ एका समाजापुरते मर्यादित नसून संपूर्ण मानवजातीसाठी मार्गदर्शक आहे. आजच्या तरुण पिढीने शिक्षण, संघटन आणि संघर्ष या त्रिसूत्रीचा अवलंब करून समाज परिवर्तनाच्या दिशेने वाटचाल करणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

अमित काळे म्हणाले की, रिपब्लिकन पक्षाच्या माध्यमातून आम्ही बाबासाहेबांच्या विचारांचा प्रसार करण्यासाठी कटिबद्ध आहोत. भीम जयंतीसारख्या कार्यक्रमांमुळे समाजात एकजूट निर्माण होते आणि नव्या पिढीला प्रेरणा मिळते. सामाजिक समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांची जपणूक करणे हीच बाबासाहेबांना खरी आदरांजली ठरणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

दिलीप टिपरसे व जगदीश मुलगिर सत्काराला उत्तर देताना सांगितले की, पोलिस दलाचे कर्तव्य म्हणजे समाजात कायदा व सुव्यवस्था राखणे आणि नागरिकांच्या सुरक्षेसाठी सदैव तत्पर राहणे. बाबासाहेबांच्या विचारांप्रमाणे न्याय आणि समतेच्या तत्वांवर काम करत आम्ही आमचे कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडत राहणार असल्याचा विश्वास व्यक्त केला.

# लेझिमच्या ठेक्यावर भीम जयंतीचा जल्लोष; चिमुकल्यांचे दमदार सादरीकरण, ज्ञानदीप फाउंडेशनच्या विद्यार्थ्यांचे अभिवादन; भीम गीतांनी भारावला परिसर

## बोल्हेगावात १७ ते १९ एप्रिल दरम्यान तीन दिवस रंगणार भीम जयंती सोहळा



ज्ञानदीप फाउंडेशन व आंतरराष्ट्रीय मानवाधिकार संघाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त लेझिमच्या ठेक्यावर चिमुकल्यांनी भीम जयंती साजरी केली.

नगर – भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त ज्ञानदीप फाउंडेशनच्या विद्यार्थ्यांनी पारंपारिक लेझिम पथकाच्या माध्यमातून बाबासाहेबांना अनोखे अभिवादन केले. या मिरवणुकीत चिमुकल्या विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवत भीम गीत व छत्रपती शिवाजी महाराजांच्या गीतांवर लेझिमचे आकर्षक डाव सादर केले. विद्यार्थ्यांच्या जोशपूर्ण सादरीकरणाने संपूर्ण वातावरण भारावून गेले होते. त्यांच्या कलागुणांना उपस्थित नागरिकांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद देत प्रोत्साहन दिले. यावेळी नगरसेवक सुरेश बनसोडे यांनी सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक करत त्यांचे स्वागत केले. कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष पंकज लोखंडे, संचालिका प्राजक्ता लोखंडे, जयश्री गायकवाड, विठ्ठल उमाप, ज्योती साठे, राजू डोईफोडे, राजेंद्र लोखंडे, अमित लोखंडे, प्राजक्ता लोखंडे, नितीन साठे, पूजा लोखंडे, राजू उमाप, जावेद सय्यद, दिलशाद अन्सारी, रमेश लोखंडे, अनिल डोईफोडे, क्लेरा डोईफोडे, जॉन्सन लोखंडे, प्रशांत लोखंडे, सिद्धी ओहोळ, रेखा गायकवाड, प्रगती गायकवाड, प्रियंका जाधव, अक्षय लोखंडे आदी उपस्थित होते.

ज्ञानदीप फाउंडेशन व आंतरराष्ट्रीय मानवाधिकार संघाच्या वतीने आमदार संग्राम जगताप, नगरसेवक सुरेश बनसोडे व कुमारसिंह वाकळे यांच्या मार्गदर्शनाखाली १७, १८ व १९ एप्रिल रोजी बोल्हेगाव येथे 'भीम जयंती सप्ताह' अंतर्गत संविधान जागर अभियान राबविण्यात येणार आहे. या तीन दिवसीय उपक्रमात पारंपारिक वाद्यांसह विविध सांस्कृतिक कार्यक्रम, भीम गीतांचा कार्यक्रम तसेच विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.



विश्व हिंदू परिषद पश्चिम महाराष्ट्र प्रांताची बैठक प्रसंगी उपस्थित पदाधिकारी.

# विश्व हिंदू परिषद अहिल्यानगर जिल्हा नवीन नियुक्त्या जाहीर

नगर – विश्व हिंदू परिषद पश्चिम महाराष्ट्र प्रांताची बैठक ५ एप्रिल रोजी पुणे येथे उत्साहात पार पडली. या बैठकीला केंद्रीय संघटन महामंत्री मिलिंद परांडे तसेच प्रांत अध्यक्ष गजानन धरणे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. प्रांत मंत्री किशोर चव्हाण यांनी यावेळी नवीन नियुक्त्या जाहीर केल्या. सध्याचे विभाग मंत्री सुनील खिस्ती यांना प्रांत सत्संग सह प्रमुख अशी अतिरिक्त जबाबदारी देण्यात आली तर जिल्हा सहमंत्री म्हणून राजेंद्र चुंबळकर व प्रताप तांदळे यांची नियुक्ती करण्यात आली, तसेच बजरंग दल जिल्हा संयोजक म्हणून सोमनाथ चितळकर यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात आली.

या प्रसंगी जिल्हा पालक व प्रांत सहमंत्री ॲड. सतीश गोरडे, जिल्हाध्यक्ष आशुतोष लांडगे, जिल्हा मातृशक्ती प्रमुख हिराताई शहापुरे, विभाग संयोजिका पुजाताई लष्करे, दुर्गा वाहिनी जिल्हा संयोजिका जयश्रीताई पोटे तसेच प्रांतातील सर्व जिल्ह्यांमधील पदाधिकारी उपस्थित होते.

# आपल्या भवनाची अंतर्गत सजावट.. जरा जपून...

कोणत्याही भवनाची अंतर्गत सजावट हा फार नाजूक आणि भवनातल्या व्यक्तींच्या भावनेला हात घालणारा विषय. वास्तुशास्त्रात सुद्धा या विषयाला विशेष महत्त्व आहे. पण अंतर्गत सजावट करताना म्हणजेच (वास्तूचे इंटेरियर) करताना त्या वास्तुत राहणाऱ्या व्यक्तिमत्त्वांची जुनी सामाजिक नाळ तुटू न देता आधुनिक जगाशी अत्यंत हळुवारपणे ती नाळ जुळवून देता आली पाहिजे. याची काळजी गृह सजावटकाराने (म्हणजेच इंटिरियर डिझायनरने) घेणे अत्यंत गरजेचे आहे.

इंटिरियर मुळे एखाद्या कुटुंबाचा सामाजिक दर्जा हा लोकांसमोर निश्चितपणे अधिक खुलवला जातो किंवा थोडं अधिक स्वरूपात तो दाखवला जातो. पण ती अंतर्गत सजावट अचूक न झाल्यास त्या कुटुंबाला वेगळ्याच सामाजिक संघर्षाला सामोरे जावे लागते किंवा त्या कुटुंबाचे आपल्या आप्तजनांना मित्र परिवाराला विचित्र अनुभव आल्याशिवाय राहत नाही. याचं प्रमुख कारण त्या वास्तुत बऱ्याच वेळेला अनावश्यक वापरलेल्या वस्तू किंवा फर्निचर.

म्हणून वास्तू अभियंत्याला आपल्या ग्राहकाचे पूर्वीची सामाजिक स्थिती आणि आपण केलेल्या अंतर्गत रचनेचा त्याच्यावर, त्याच्या कुटुंबावर आणि त्याच्या देह बोलीच्या माध्यमातून सामाजिक परिणामाचा अंदाज येणं अत्यंत गरजेचं आहे आणि त्यामुळेच वास्तूला घराचा 'फील' येणं किंवा तो टिकवणं हे अत्यंत गरजेचं आहे. जेणेकरून आपल्या पुढच्या पिढ्या रुळावरून घसरणार नाहीत, आणि खरंतर तेच त्याचं (इंटिरियर डिझायनर चे) कौशल्य आहे.

वास्तुशास्त्रात अंतर्गत रचने एवढेच अंतर्गत सजावटीला सुद्धा तेवढेच महत्त्व आहे. ग्रहांचा अंमल हा व्यक्तीवर जसा आहे तसाच तो त्या व्यक्तीच्या अत्यंत जिव्हाळ्याच्या अशा वास्तूवर सुद्धा आहे. ग्रहांचा तोच अंमल त्या वास्तूच्या रचनेवर जेवढा आहे तेवढाच किंवा त्यापेक्षा जास्त वास्तुतल्या अंतर्गत सजावटीला आणि त्या सजावटीसाठी वापरात येणाऱ्या वस्तूंवर सुद्धा तितकाच आहे.

बऱ्याच वेळेला एखादी वास्तू रेनोवेट केली किंवा एखादी एखाद्याने पूर्वीपेक्षा आत्ता थोडी महागाची वास्तू घेतली किंवा बांधली तर अशी व्यक्ती किंवा असे कुटुंब स्वतःला एका स्तरावर नेण्याचा प्रयत्न करत असते. पण बऱ्याच वेळेला अशा व्यक्तींची व्यवसायिक, सामाजिक किंवा कौटुंबिक जाण अंतर्गत सजावट करणाऱ्या अभिकर्त्याला नसल्यामुळे काहीतरी वेगळं करून दाखवून आपल्या ग्राहकाचा स्तर वाढवण्याचा त्याचा म्हणजेच अभिकर्त्याचा कसोशीने प्रयत्न असतो. आणि तो सहाजिक आहे.मात्र ती तथाकथित सोयीची रचना तसेच ती अंतर्गत सजावट त्या व्यक्तीच्या कुटुंबाच्या स्वभावाशी मिळती जुळती आहे का याचा अभ्यास सहसा कोणी अभिकर्ता करत नाही. मात्र त्यातून होणारे व्यक्तिगत आणि सामाजिक परिणाम भीषण असतात.

**– डॉ. कौस्तुभ काळे,**
वास्तु वाचस्पती,
अहिल्यानगर. ९८५०९४१८८१

# वाहेगुरु सेवा ग्रुपचा प्रेरणादायी समाजसेवा उपक्रम

## बैसाखी निमित्त दिव्यांगांना मदतीचा हात; किराणा किटचे वाटप



अहिल्यानगर येथे वाहेगुरु सेवा ग्रुपच्या वतीने बैसाखीच्या पवित्र निमित्ताने दिव्यांग बांधवांसाठी एक प्रेरणादायी समाजसेवा उपक्रम राबविण्यात आला.

नगर – अहिल्यानगर येथे वाहेगुरु सेवा ग्रुपच्या वतीने बैसाखीच्या पवित्र निमित्ताने दिव्यांग बांधवांसाठी एक प्रेरणादायी समाजसेवा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रम ंतर्गत गरजू दिव्यांगांना किराणा किटचे वाटप करण्यात आले.

या वेळी राजू सिंग धुप्पड, डॉ. वैजनाथ गुराऊळे, गुरले अवतार, अमर सावंत, डॉ. संदीप कलमकर, यश सुखीजा, अशोक खुबचंदाणी, जितेंद्र कपूर, राकेश गुलाटी, निप्पू सिंग दुपर, नीतू धुप्पड, बबलू खोसला, संभाजी भोर, अनिल चाबुकस्वार, महेश पांडुळे आदी उपस्थित होते.

अशोक खुबचंदाणी यांनी मनोगतात सांगितले की समाजसेवा ही केवळ कर्तव्य नसून ती एक पवित्र भावना आहे. वाहेगुरु सेवा ग्रुपच्या माध्यमातून बैसाखीच्या निमित्ताने दिव्यांग बांधवांसाठी राबविण्यात आलेला हा उपक्रम मनाला स्पर्श करणारा आहे. गरजूंना मदतीचा हात देताना त्यांच्या चेहऱ्यावर उमटलेले समाधान आणि आनंद हेच आमच्यासाठी खरे समाधान आहे.

या छोट्याशा प्रयत्नातून समाजात माणुसकी, सहकार्य आणि आपुलकीची भावना अधिक बळकट होईल, अशी अपेक्षा आहे. पुढील काळातही अशाच प्रकारचे उपक्रम राबवून समाजातील प्रत्येक घटकापर्यंत मदतीचा हात पोहोचवण्याचा आमचा निर्धार आहे. आपल्या सर्वांच्या सहकार्यामुळेच हे कार्य शक्य झाले आहे. भविष्यातही असेच प्रेम, पाठबळ आणि आशीर्वाद मिळत राहो

या उपक्रमामुळे गरजू दिव्यांगांच्या चेहऱ्यावर आनंदाचे हास्य फुलले असून, समाजात एकात्मता व सहकार्याची भावना अधिक दृढ झाली आहे.

भविष्यातही असेच प्रेम, पाठबळ आणि आशीर्वाद मिळत राहतील अशी अपेक्षा वाहे गुरु च्या वतीने करण्यात आली.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# धम्माल मनोरंजन

## दिनविशेष १७ एप्रिल

१४७८: हिंदी कवी, थोर कृष्णभक्त व कीर्तनभक्तीचे आचार्य संत सूरदास यांचा जन्म.

१८२०: बेसबॉल चे जनक अलेक्झांडर कार्टराईट यांचा जन्म. (मृत्यू: १२ जुलै १८९२)

१८३७: अमेरिकन सावकार जे. पी. मॉर्गन यांचा जन्म. (मृत्यू: ३१ मार्च १९१३)

१८९१: कोशकार यशवंत रामकृष्ण दाते यांचा जन्म. (मृत्यू: २१ मार्च १९७३)

१८९७: अद्वैत तत्त्वज्ञानी निसर्गदत्त महाराज यांचा जन्म. (मृत्यू: ८ सप्टेंबर १९८१)

१९१६: जगातील पहिल्या महिला पंतप्रधान तर श्रीलंकेच्या ६ व्या पंतप्रधान सिरिमाओ बंदरनायके यांचा जन्म. (मृत्यू: १० ऑक्टोबर २०००)

१९५१: चित्रपट अभिनेत्री बिंदूयांचा जन्म.

१९६१: बिलियर्डसपटू गीतसेठी यांचा जन्म.

१९७२: श्रीलंकेचा क्रिकेटपटू मुथय्या मुरलीधरन यांचा जन्म.

१९७७: भारतीय क्रिकेटपटू दिनेश मोंगिया यांचा जन्म.

१९४५: भारतीय राजकारणी, राजस्थानचे आमदार भंवरलाल शर्मा यांचा जन्म (मृत्यू : ९ ऑक्टोबर २०२२)

१९२७: भारताचे ८वे पंतप्रधान चंद्रा शेखर यांचा जन्म (मृत्यू : ८ जुलै २००७)

१९२३: अमेरिकन पत्रकार, ६० मिनिटस मासिकाचे सह–संस्थापक हॅरी रिझनर यांचा जन्म (मृत्यू : ६ ऑगस्ट १९९१)

१९१८: भारतीय छायाचित्रकार आणि पत्रकार – पद्मा भूषण, पद्मश्री सुनील जना यांचा जन्म (मृत्यू : २१ जून २०१२)

१७६५: भारतीय सैनिक धीरान चिन्नमलाई यांचा जन्म (मृत्यू : ३१ जुलै १८०५)

१७३४: थाई राजा ताक्सिन यांचा जन्म (मृत्यू : ७ एप्रिल १७८२)

१४७८: हिंदी कवी, थोर कृष्णभक्त व कीर्तनभक्तीचे आचार्य संत सूरदास यांचा१७ एप्रिल मृत्यू

१७९०: अमेरिकन संशोधक आणि मुत्सद्दी बेंजामिन फ्रँकलिन यांचे निधन. (जन्म: १७ जानेवारी १७०६)

१८८२: फ्लश टॉयलेट चे शोधक जॉर्ज जेनिंग्स यांचे निधन. (जन्म: १० नोव्हेंबर १८१०)

१९४६: भारत सेवक समाजाचे अध्यक्ष व्ही. एस. श्रीनिवासशास्त्री यांचे निधन. (जन्म: २२ सप्टेंबर १८६९)


१९७५: भारताचे दुसरे राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचे निधन. (जन्म: ५ सप्टेंबर १८८८)

१९९७: ओरिसाचे मुख्यमंत्री, केन्द्रीय पोलाद, खाणकाम आणि कोळसा मंत्री बिजू पटनायक यांचे निधन. (जन्म: ५ मार्च१९९८: चित्रपट निर्माते विजय सिप्पी यांचा संशयास्पद परिस्थितीत मृत्यू.

२००१: वनस्पतिशास्त्रज्ञ तसेच देवराई अभ्यासक डॉ. वा. द. वर्तक यांचे निधन. (जन्म: १९ ऑक्टोबर १९२५)

२००४: कन्नड, तामिळ, तेलुगू, मल्याळम आणि हिंदी चित्रपट अभिनेत्री सौंदर्या यांचे निधन. (जन्म: १८ जुलै १९७२)

## महाशब्दकोडे




### आडवे संकेत

१) एक प्रसिद्ध नाटककार
८) एक रागिणी, दुर्गा
१०) लिनता, विनय
११) दिसेनासे होणे
१२) डोंगराची तुटलेली सुळका, खबदडी
१३) शिंकाळी १५) सोसणे
१६) अरण्य, जंगल
१७) रानटी कबुतर
१८) ठाण्याचा मुख्य
२०) नशीब
२१) म्होरक्या, पुढारी
२२) भरीव, ठसठसीत
२४) धैर्य, हिंमत
२५) काळोख, आंधार
२७) खस
२९) पेन, पेन्सील, टाक इ. ठेविण्याची पेटी
३१) लाकुड तासण्याचे एक साधन
३४) आर्याछंद, रचना
३६) भिती, धाकदपटशा
३७) खोबऱ्याचा चुरा
३९) उसाचे पीक, रिकामपण
४०) वाळू
४२) मानवी रक्ताला चटावलेला
४४) मध्यान्हीची भयंकर उष्णता
४५) माथा, मस्तक, भाल
४६) पुढे जाणे
४८) एक व पाव
४९) पोटात पुष्कळ दिवस राहिलेला गर्भ
५०) हिंदुचे मुख्य दोन सण
५३) पत्नी
५४) लहान खण असलेली लहान पिशवी ५५) बरोबरी
५६) लाकुडकाम करणारा

### उभे संकेत

१) अंतर्वेधी
२) विडी, सिगरेट पिणे
३) रांग, ओळ
४) वजनदार ५) मोठी फांदी
६) पिकांना वाळवून टाकणारी एक किड ७) वाकणे, झुकणे
९) हवा घालणारा पंखा
१४) आजारातून बरा झालेला, फ्रेश
१५) खजिन्यावरील मुख्य अधिकारी
१७) पर्जन्यकाळ
१८) योग्य, बरोबर
१९) गर्द, पुर्ण भरलेले
२०) चांगल्या नशिबाचा
२३) पती, सखा
२६) छंदिष्ठ, दुर्व्यसनी
२८) नोकदार
३०) तेज, चकाकी
३१) विष्णूचे एक नाव
३२) टिपासह ३३) भ्रमण
३५) हवाबदल
३८) चिता
३९) वारस आहे असा दावा करणारा
४१) एक तेल बी
४३) आठवड्यातील एक दिवस
४५) कौशल्य
४७) मळ, उसाचे घाण पाणी
५१) खरी गोष्ट, खरे
५२) दिवस, दिन

### मागील उत्तर






१) बंदी जीवन हे पुस्तक कोणी लिहिले?
अ)सचिंद्रनाथ सन्याल ब)भगतसिंग
क)इश्वरचंद्र विद्यासागर ड)अरविंद घोष

२) स्वामी श्रद्धानंदांनी गुरुकुल कांगळी ही शिक्षण संस्था कोठे स्थापन केली? अ)गया ब)अलाहाबाद क)हरिद्वार ड)बनारस

३) तिसऱ्या पंचवार्षिक योजनाचा साध्य विकास दर किती होता?
अ)५.४ टक्के ब)२.३ टक्के क)६.६ टक्के ड)४.६ टक्के

४) वाटाण्याच्या बिजात अन्नांसंचय खालीलपैकी कोणता केलेला असतो?
अ)बिजपत्रात ब)आवरणात क)भ्रूणकोषात ड)भ्रूणांकुरात

५) रंगहिन हवेपेक्षा जड व उग्र वायु कोणता?
अ)ओझोन ब)नायट्रोजन क)कार्बनडाय ऑक्साईड ड)हायड्रोजन

६) अटलांटिक महासागर व भूमध्य समुद्र यांनाजोडणारी सामुद्रधूनी कोणी?
अ)जिब्राल्टर ब)मल्लाका क)सार्बतो ड)युकेटन

७) पुढीलपैकी कोणताप्राणी सस्तन वर्गात मोडत नाही?
अ)देवमासा ब)चिचुंद्री क)डकबील ड)टोंड

८) शरिरांतर्गत स्नायुंना ऊब देण्यासाठी कशाचा वापर करतात?
अ)गॅमा किरण ज्योत ब)इन्फ्रारेड लॅम्प क)अतिनिल तरंग ड)क्ष– किरण

९) गुरत्वबल व विद्युत चुंबकिय बल यांच्यापेक्षा कोणते बल मोठे असते?
अ)आण्विक बल ब)स्थितीजन्य बल क)तांत्रिक बल ड)गतिजन्य बल

१०) सौर विद्युत घटकांमध्ये विशेष प्रक्रिया केलेले कोणते मुलद्रव्य वापरतात?
अ)टंगस्टन ब)ॲल्युमिनिअम क)सिलिकॉन ड) जर्मेनिअम

११) इ.स. १८५७ साली मंगलपांडे यांनी कोठे उठाव केला?
अ)मिरत ब)बरेली क)दिल्ली ड)बराकपूर

१२) स्पायरोगायरा या वनस्पतीत कोणत्या प्रकारचे विभाजन होते?
अ)अर्धसुत्री ब)द्विविभाजन क)सुत्री ड) असुत्री

१३) फुलांचा रंग कशावर अवलंबून असतो?
अ)मॅगनीज ब)ॲन्थ्रोसायनीन क)ॲसीटीक ॲसिड ड)इथिलीन

१४) भारतात ब्रिटीशांची कोणती राजधानी दीर्घ काळ राहिली?
अ)कलकत्ता ब)मुंबई क)चेन्नई ड)दिल्ली

१५)सातव्या योजनेच घोषवाक्य काय होते?
अ)अन्न,काम, उत्पादकता ब)गरिबी निमुर्लन
क)आर्थिक स्वावलंबन ड)यापैकी नाही

१६)कर्झनच्या काळात जमजेठजी टाटा यांनी विज्ञान संस्था कोठे उभारली?
अ)ढाका ब)अलाहाबाद क)बंगळुर ड) दिल्ली

१७)बराकपुर नंतर कोणत्या ठिकाणी बंडाससुरुवात झाली?
अ)मेरठ ब)दिल्ली क)लखनौ ड)कानपूर

१८) खालीलपैकी कोणत्या किरणांना वस्तुमान नसते?
अ)क्ष किरण ब)अल्फा क)बिटा ड)गॅमा

१९)मानवाच्या शरिरातील महत्त्वाची खनिजद्रव्य कोणती?
अ)लोह व कॅल्शियम ब)कॅल्शियम व फॉस्फरस
क)मॅग्नीशियम व कॅल्शियम ड) कॅल्शियम व सोडियम

२०) बांगळी हा रोग कोणत्या भाजीवर आढळून येतो?
अ)पालक ब)बटाटा क)टमाटर ड)कोबी

२१) काच..., गारगोटी, नायलॉन किंवा प्लॅस्टीकपासून काय तयार करतात?
अ)पेट्रोधातू ब)रेऑन क)प्रकाशतंतू ड)वरिल सर्व

उत्तरः (१–अ), (२–क), (३–ब ), (४–अ), (५–क), (६–अ), (७–ड), (८–ब), (९–अ ), (१०–क ), (११– ड), (१२–क), (१३–ब), (१४–अ), (१५–अ), (१६–ड), (१७–अ), (१८–ड), (१९–ब), (२०–ब), (२१–क)

## विनोद



वडील कामावरून आल्याबरोबर राजू त्यांना बिलगला व म्हणाला, 'बाबा, आज आई ना तुम्हाला शिव्या देत होती।'
वडील– काय, मला?
राजू– होय, ती मला गाढवाच्या लेका... पोरा असे म्हणाली.


---

मुलगा– आई, घरी जेवढे लोक शेतात त्या सर्वांना मला काका महणायला सांगतेस
आई– होय बाळ। काका म्हणायलाच हवे.
मुलगा–पण ते सारे काकाच आहेत का?
आई– होय बाळ।
मुलगा– आई, तू ना फारच कंजूष आहेस काका तर ढीगभर आहेत. पण बाबा मात्र एकच आहेत.

## टिप्स

अर्धा किलो चिंच अर्धा लीटर पाण्यात दोन तास भिजवून तिचा कोळ (गर) काढावा. पीठ चाळवयाच्या प्लॅस्टिकच्या किंवा स्टेनलेस स्टीलच्या चाळणीतून गर छानून घ्यावा. त्यात मोठो दोन चमचे मीठ व अर्धा कप व्हिनिगर घालून उकळावे. दाट झाल्यावर गार करुन छोट्या बाटल्यांत भरुन फ्रीमध्ये ठेवावे. जरुरीच्या वेळी आवश्यक तेवढे चटकन वापरता येते. रोजच्या जेवणात चिंचेचा उपयो करताना रोज गोळा भिजवून कोळ काढायचा त्रास वाचतो. याच मिश्रणात गूळ, तिखट, चार– पाच लवंगा, सात– आठ मिरीचे दाणे व दालचिनीचे दोन तुकडे घालून शिजवल्यास तयार झालेले चिंचेचे सॉस मासाहारी पदार्थांबरोबर चविष्ट लागते. थोडे पातळ करुन भेळ करतानाही वापरता येते.





### आडवे संकेत

१) तेरे नाम या चित्रपटाचे संगीतकार.
२) का गुलाम (चित्रपट)
३) सन १९८३ मध्ये मोहन कुमार दिग्दर्शीत या चित्रपटात राजेश खन्ना, शबाना आझमी होते.
६) सन १९९९ मध्ये दिग्दर्शक विरु देवगनच्या या चित्रपटात अजय देवगन व मनिषा कोईराला होते.
९) अग्निहोत्री (नायीका)
१०) राहुल बोल व करिना कपूर अभिनीत चित्रपट.
११) सन १९९१ मध्ये आलेल्या या चित्रपटात अनुपम खेर व डिम्पल कपाडिया होते.
१३) कमल (चित्रपट)
१४) संजय लिला भंसाली दिग्दर्शीत या चित्रपटात अजय देवगन, ऐश्वर्या रॉय आणि सलमान खान होते.
१८) सनम (चित्रपट)
१९) सन १९९९ मध्ये राजकंवर दिग्दर्शीत या चित्रपटात संजय दत्त आणि चंद्रचुड सिंह, महिला चौधरी होते.
२१) सन १९७१ मध्ये सी.पी. दिक्षीत दिग्दर्शीत या चित्रपटात शत्रूघ्न सिन्हा व राखी होते.
२२) पती पत्नी और (चित्रपट)
२३) सन १९८४ मध्ये के. बापैय्या दिग्दर्शीत या चित्रपटात राजेश खन्ना व श्रीदेवी होते.
२५) महेश भट्ट दिग्दर्शीत या चित्रपटात जैकी श्रॉफ व मनिषा कोईराला होते.
२६) अक्षय कुमार, आयशा जुल्का आणि सुनील शेट्टी, ममता कुलकर्णी यांचा चित्रपट.
२७) आगा (गायीका)
२८) सन १९७२ मध्ये मोहन सहगल दिग्दर्शीत या चित्रपटात धर्मेंद्र व हेमा मालिनी होते.

### उभे संकेत

१) अरशद वारसी व नम्रता शिरोडकर अभिनीत चित्रपट.
२) सनी देओल व सुष्मिता सेन अभिनीत चित्रपट.
३) अबकर अँथोनी (चित्रपट)
४) अक्षय खन्ना, ऐश्वर्या रॉय आणि अनिल कपूर यांचा चित्रपट.
५) सन १९८३ मध्ये के. बापैय्या दिग्दर्शीत या चित्रपटात जितेंद्र व श्रीदेवी होते.

## फिल्मी शब्दकोडे

७) सन १९८२ मध्ये प्रकाश मेहरा दिग्दर्शीत या चित्रपटात अमिताभ बच्चन व स्मिता पाटील होते.
८) सन १९८० मध्ये दिग्दर्शक सुभाष घईच्या या चित्रपटात ऋषी कपूर व टिनु मुनीम होते.
१०) सन १९७६ मध्ये रामानंद सागर दिग्दर्शीत या चित्रपटात धर्मेंद्र व हेमा मालिनी होते.
१२) सनी देओल, सुनील शेट्टी आणि अजय जडेजा यांचा चित्रपट.
१५) सन १९७७ मध्ये यश चोपडा दिग्दर्शीत या चित्रपटात शाहरुख खान, करिश्मा कपूर आणि माधुरी दीक्षीत होते.
१६) डोला रे डोला रे डोला... हे गाणं या चित्रपटातील आहे.
१७) इंडीया (चित्रपट)
१८) सन १९९२ मध्ये के. विश्वनाथ दिग्दर्शीत या चित्रपटात जैकी श्रॉफ व माधुरी दीक्षीत होते.
२०) सन १९९९ मध्ये दिग्दर्शक लतिफ बिन्नीच्या चित्रपटात अक्षय खन्ना, सोनाली बेंद्रे होते.
२३) सन १९९८ मध्ये अनिल शर्मा च्या या चित्रपटात गोविंदा व मनिषा कोईराला होते.
२४) मिथून चक्रवर्ती, आयजा जुल्का आणि राज बब्बर यांचा चित्रपट.
२५) मोहन (चित्रपट)

### मागील फिल्मी उत्तर



## पाक कला

चायनीज मुगवडी



साहित्यः २ वाटी मुगवडी, वरीलप्रमाणे मुगवडीची सुक्रि भाजी शिजवून घ्यावी. बारीक चिरलेल्या भाज्या– सिमला मिरची, पत्ताकोबी गाजर, पातळ काप करुन घ्यावे. १ चमचा सोया सॉस, दीड चमचा टोमॅटो सॉस, मिरेपूड अर्धा बारीक चिरलेला कांदा, १/२ वाटी बारीक चिरलेला लसूण १ चमचा अद्रक किसून १ च.

कृतीः प्रथम पॅनमध्ये थोड्या तेलावर लसूण घाला. परतावा, कांदा घालावा, अद्रक पेस्ट घालावी व परतून सर्व बारीक चिरलेल्या भाज्या घालाव्यात. थोड्याशा परतून गरमागरम मुलांना खायला द्यावी. वेगळ्या चवीचा ॲटम मुले आवडीने खातील.

# सातारळकर लोटस सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल येथे नगर जिल्ह्यातील पहिलेच 'रोबोटिक सर्जरी सेंटर'

## अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर १९ एप्रिल रोजी लोकार्पण



डॉ. मुग्धा एच. तनवर साताळकर | डॉ. हर्षवर्धन तनवर | डॉ. सुदर्शन डागा



नगर – अहिल्यानगरच्या वैद्यकीय क्षेत्रात सातत्याने अत्याधुनिक उपचार सेवा देणाऱ्या साताळकर लोटस सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल येथे सातत्याने नवनवीन वैद्यकीय तंत्रज्ञान आणून सर्वोत्तम आरोग्य सेवा दिली जाते. डॉ. रवींद्र साताळकर यांनी सुमारे ४८ वर्षांपूर्वी सुरू केलेल्या या सेवाकार्याचा हॉस्पिटल द्वारे विस्तार झाला आहे. आता याठिकाणी अहिल्यानगर जिल्ह्यातील पहिलेच रोबोटिक सर्जरी सेंटर सुरू होत आहे. अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर १९ एप्रिल रोजी सायंकाळी ६ वाजता तारकेश्वर गडाचे महंत आदिनाथ महाराज शास्त्री, आ. संग्राम जगताप, डॉ. सुजय विखे पाटील यांच्या हस्ते सेंटरचा शुभारंभ होईल अशी माहिती युरोलॉजी तज्ज्ञ डॉ. हर्षवर्धन तन्वर, डॉ. सुदर्शन डागा, स्त्री रोग व वंध्यत्व निवारण तज्ज्ञ डॉ. मुग्धा तन्वर – साताळकर यांनी दिली.

अहिल्यानगरच्या आरोग्य क्षेत्रातील नवीन पर्व रोबोटिक सर्जरी सेंटरच्या माध्यमातून सुरू होत आहे. पोटातील सर्व आजारांच्या शस्त्रक्रिया, गर्भाशय पिशवी शस्त्रक्रिया, पोटातील कॅन्सर शस्त्रक्रिया, प्रोस्टेट शस्त्रक्रिया, किडनी कॅन्सर शस्त्रक्रिया, हर्निया शस्त्रक्रिया, पित्ताशय शस्त्रक्रिया रोबोटिक तंत्रज्ञानाने केल्या जातील. अचूक, सुरक्षित आणि किफायतशीर उपचार सुविधा या सेंटरमध्ये मिळणार आहेत. नगरसह शेजारील जिल्ह्यातील रूग्णांसाठी हे रोबोटिक सर्जरी सेंटर उपयुक्त ठरणार आहे. यासाठी जागतिक दर्जाच्या रोबोटिक मशीनरी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

साताळकर हॉस्पिटल येथे अद्ययावत युरोलॉजी विभाग कार्यरत आहे. याठिकाणी डॉ. हर्षवर्धन तन्वर आणि डॉ. सुदर्शन डागा उपचार सुविधा देतात. याठिकाणी ॲडव्हान्स प्लाझ्मा सर्जरी फॉर प्रोस्टेट, लॅप्रोस्कोपी किडनी सर्जरी, युरेथ्रोप्लास्टि फॉर स्ट्रीक्चर युरेथ्रा, ॲडव्हान्स एण्डोस्कोपी स्टोन सर्जरी, एण्डोस्कोपी युरेट्रिक स्टोन सर्जरी, ब्लॅडर स्टोन सर्जरी, पेडियेट्रिक किडनी स्टोन मॅनेजमेंट सेवा उपलब्ध आहे. सर्व शस्त्रक्रियांसाठी अत्याधुनिक मशिनरी उपलब्ध आहेत. हॉस्पिटलमध्ये प्रोस्टेट ग्रंथी विकार निदान व उपचार, कॅन्सर क्लिनिक, मूत्राशयासंबधित आजार निदान व उपचार, मूतखडा निदान व उपचार, पुरूषांमधील लैंगिक आजार उपचार, लहान मुले, वृद्धांमधील मूत्राशय संबंधित आजार, डायलेसिस सुविधा उपलब्ध आहेत.

डॉ. मुग्धा तन्वर यांच्या मार्गदर्शनाखाली स्त्री रोग, प्रसूती निदान व उपचार, दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया, वंध्यत्व निदान व उपचार, नवजात शिशू दक्षता विभाग, कर्करोग निदान, सोनोग्राफी, एक्स रे, सुसज्ज लॅबोरेटरी उपलब्ध आहे. अत्याधुनिक उपचार सुविधांचा विस्तार करीत आता रोबोटिक सर्जरी सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या अत्याधुनिक उपचार सुविधांचा रूग्णांनी लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# अहिल्यानगर अग्निशमन दलाच्या चौघांना केंद्र सरकारचा पुरस्कार जाहीर



शंकर मिसाळ | चिंधू भांगरे | भरत पडगे | रविंद्र साठे

नगर – भारत सरकारच्या गृह मंत्रालयाच्या अंतर्गत असलेल्या महानिदेशालय (अग्निशमन सेवा, नागरी संरक्षण आणि गृहरक्षक) यांच्या वतीने 'अग्निशमन सेवा सप्ताह २०२६' च्या विशेष निमित्ताने राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. पुरस्कार मिळालेल्या राज्यातील २८ कर्मचाऱ्यांपैकी अहिल्यानगर महानगरपालिकेच्या अग्निशमन दलातील चार जवानांना राष्ट्रीय स्तरावरील हा मानाचा पुरस्कार जाहीर झाला असल्याची माहिती आयुक्त यशवंत डांगे यांनी दिली.

नवी दिल्ली येथील मुख्यालयातून १३ एप्रिल रोजी जारी करण्यात आलेल्या पत्रानुसार, या पुरस्कारासाठी अहिल्यानगर अग्निशमन दलाचे प्रमुख शंकर उत्तम मिसाळ (चीफ फायर ऑफिसर), वाहनचालक चिंधू राघू भांगरे (ड्रायव्हर ऑपरेटर), आणि अग्निशमन मदतनीस (फायरमन हेल्पर) भरत अशोक पडगे तसेच रवींद्र गोविंद साठे यांची निवड करण्यात आली आहे. अग्निशमन दलाचे जवान स्वतःच्या जीवाची पर्वा न करता आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांचे प्राण आणि सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करत असतात. या जवानांनी आणीबाणीच्या आणि धोक्याच्या प्रसंगी सातत्याने दाखवलेले धाडस, त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीचा आलेख आणि कर्तव्याप्रती असलेली निष्ठा या निकषांच्या आधारावर त्यांना या पुरस्कारासाठी पात्र ठरवण्यात आले आहे. देशातील जवानांच्या शौर्याला आणि त्यांच्या निस्वार्थ सेवेला प्रोत्साहन देऊन त्यांचा यथोचित गौरव करणे हा या सन्मानामागील मुख्य उद्देश आहे. या पुरस्काराचे स्वरूप कांस्य पदक आणि प्रशंसा प्रमाणपत्र असे आहे.

महाराष्ट्र अग्निशमन सेवेच्या संचालकांना पाठवण्यात आलेल्या पत्रानुसार, संपूर्ण महाराष्ट्रातील एकूण २८ जवानांना या सन्मानासाठी पात्र घोषित करण्यात आले आहे. त्यात अहिल्यानगरच्या या चार जवानांचा समावेश असल्याने शहराच्या आणि महानगरपालिकेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. या उल्लेखनीय आणि अभिमानास्पद यशाबद्दल पुरस्कार प्राप्त जवानांचे महानगरपालिकेच्या वतीने अभिनंदन करण्यात आल्याचे आयुक्त यशवंत डांगे यांनी सांगितले.

# नूतन केमिस्ट भवनाचे १९ एप्रिलला उद्घाटन



नगर – अहिल्यानगर डिस्ट्रिक्ट केमिस्ट ॲण्ड ड्रगिस्ट असोसिएशनच्या वतीने बुरुडगांव रोड येथे उभारण्यात आलेल्या नूतन केमिस्ट भवनाचे १९ एप्रिल रोजी दुपारी ४ वाजता उद्घाटन होणार आहे. भवनाचे उद्घाटन अखिल भारतीय व महाराष्ट्र राज्य केमिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष जगन्नाथ उर्फ आप्पासाहेब शिंदे, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते होणार आहे. या प्रसंगी आमदार संग्राम जगताप, भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील, महापौर ज्योतीताई गाडे, उपमहापौर धनंजय जाधव आदींची उपस्थिती लाभणार आहे.

याशिवाय महाराष्ट्र राज्य केमिस्ट असोसिएशनचे सचिव अनिल नावंदर, एम.आय.ओ.सी.डी. सदस्य अजित पारख, उपाध्यक्ष सेंल झोन ऑफ एम.एस.सी.डी.ए. शशांक रासकर, संघटक सचिव शशांक रासकर, औषध निरीक्षक (अन्न व औषध प्रशासन) जावेद शेख, औषध निरीक्षक सोमनाथ मुळे, ए.आय.ओ.सी.डी. सदस्य अजित पारख, ओमप्रकाश गुलाटी ट्रस्टचे अध्यक्ष रविंद्र गुलाटी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

नूतन केमिस्ट भवन हे केवळ कार्यालयीन जागा नसून, जिल्ह्यातील केमिस्ट बांधवांसाठी संवाद, नियोजन आणि प्रशिक्षण यांचे केंद्र म्हणून विकसित करण्यात आले आहे. या भवनामुळे संघटनात्मक कार्य अधिक सक्षम होण्यास मदत होणार असून, विविध सामाजिक व व्यावसायिक उपक्रमांना चालना मिळणार आहे. या उद्घाटन सोहळ्यासाठी जिल्हा केमिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष दत्ता गाडळकर, सचिव आबासाहेब बेद्रे व खजिनदार प्रशांत उबाळे यांनी जिल्ह्यातील सर्व केमिस्ट बांधवांना उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

दरम्यान, केमिस्ट असोसिएशनची वार्षिक सभा नक्षत्र लॉन व सांस्कृतिक हॉल येथे आयोजित करण्यात आली आहे. या कार्यक्रमासाठी उपाध्यक्ष सुर्यकांत भुजाडी, गणेश वाणी, अतुल चांगले, सहसचिव सचिन शिंदे, शहर उपाध्यक्ष भरत सुपेकर, शहर सचिव मनिष सोमाणी, शहर खजिनदार मनोज खेडकर, शहर सहसचिव मनिषा महेश आठरे तसेच सर्व कार्यकारिणी सदस्य, जिल्हा, शहर व तालुका केमिस्ट असोसिएशनचे सदस्य आणि संयुक्त केमिस्ट भवन निर्माण समितीचे पदाधिकारी प्रयत्नशील आहेत.

# अहिल्यानगर शहरामध्ये प्रथमच २६ एप्रिल रोजी रुमॅटोलॉजी व यूव्हीयाटिस तपासणी संयुक्त शिबिर



डॉ. हितेशी जैन देशपांडे

नगर – अहिल्यानगरमध्ये प्रथमच एक विशेष आणि अनोखे वैद्यकीय शिबिर आयोजित करण्यात येत आहे. रुमॅटोलॉजी आणि यूव्हीयाटिस या दोन परस्पर संबंधित शाखांतील तज्ज्ञ डॉक्टर एकत्र येऊन रुग्णांची तपासणी करणार आहेत. २६ एप्रिल रोजी सकाळी ९ ते ३ यावेळेत देशपांडे हॉस्पिटल, पटवर्धन चौक येथे हे शिबिर होणार आहे. रेटिना व यूव्हीयाटिस तज्ज्ञ डॉ. हितेशी जैन देशपांडे व रुमॅटोलॉजिस्ट डॉ. अदिती पाटणकर देशपांडे रूग्ण तपासणी करतील.

डोळ्यातील यूव्हिया हा भाग डोळ्याला. रक्तपुरवठा करणारा अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. यामुळे डोळे हे शरीरापासून वेगळे नसून संपूर्ण शरीराशी घट्टपणे जोडलेले असतात. शरीरातील इतर कोणतेही आजार, विशेषतः रोगप्रतिकारक शक्तीशी संबंधित आजार, डोळ्यांवर परिणाम करू शकतात. उदा. Systemic Lupus Erythematosus, Psoriasis, Ankylosing Spondylitis तसेच Sarcoidosis आणि टिबी सारखे आजार डोळ्यांवर परिणाम करू शकतात कधी कधी शरीरातील इतर लक्षणे दिसण्यापूर्वीच. दुर्दैवाने, अशा यूव्हीयाटिस सारख्या डोळ्यांच्या आजारांबद्दल जागरूकता खूप कमी आहे.

एक महत्त्वाची पण दुर्लक्षित समस्या. अशा अनेक रुग्णांचे निदान चुकीचे होते किंवा अपुरे उपचार केले जातात. अनेक वेळा रुग्णांना स्टेरॉइड्स दिले जातात, ज्यामुळे सूज आणि लक्षणे तात्पुरती कमी होतात आणि रुग्णाला बरे वाटते. पण मुळ कारणावर उपचार होत नाहीत. यामुळे पुन्हा पुन्हा त्रास होणे, निदान उशिरा होणे आणि काही वेळा कायमस्वरूपी दृष्टीदोष होण्याचा धोका वाढतो. म्हणूनच अशा रुग्णांनी रेटिना आणि यूव्हीयाटिस तज्ञ डॉक्टरांकडून तपासणी करून घेणे अत्यंत आवश्यक आहे, जे मुळ कारण शोधून योग्य उपचार देऊ शकतात.

या शिबिरात रुग्णांची तपासणी यूव्हीयाटिस तज्ज्ञ आणि रुमॅटोलॉजिस्ट यांच्या संयुक्त मार्गदर्शनाखाली होणार आहे. यामुळे संपूर्ण शरीराचा विचार करून योग्य निदान व उपचार करता येतील, ज्यामुळे गुंतागुंत टाळता येईल आणि दृष्टी वाचवता येईल. खालील तक्रारी असलेल्या रुग्णांनी या शिबिराचा लाभ घ्यावा: वारंवार डोळे लाल होणे, दुखणे किंवा प्रकाश सहन न होणे, डोळ्यांशी संबंधित डोकेदुखी, डोळ्यांमध्ये किंवा आसपास सूज येणे, आधीपासून टोइम्युन आजार असणे, सांधेदुखी, पाठदुखी (विशेषतः सकाळी स्टिफनेस, किंवा इतर अस्पष्ट लक्षणे, वारंवार होणारी किंवा बरी न होणारी यूव्हीयाटिस. हे शिबिर केवळ तपासणीपुरते मर्यादित नसून, शरीरातील आजार आणि डोळ्यांचे आरोग्य यामधील संबंध समजून घेण्याचा एक प्रयत्न आहे. योग्य वेळी निदान आणि उपचार केल्यास गंभीर गुंतागुंत आणि दृष्टी कमी होणे टाळता येऊ शकते. जर तुम्हाला किंवा तुमच्या ओळखीतील कोणाला अशा प्रकारच्या तक्रारी असतील, तर या शिबिराचा लाभ घ्या. माहितीसाठी संपर्क: ८०८०४९६१२२.



भारतीय तंत्रज्ञान संस्था (आयआयटी बॉम्बे) येथे 'श्री सांदिपनी अकॅडमी' च्या वतीने एका विशेष शैक्षणिक भेटीचे आयोजन करण्यात आले होते.

# आयआयटी मुंबईत घुमला श्री सांदिपनी अकॅडमीच्या यशाचा जयघोष

## डॉ. के. बालराजु यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांचा यशस्वी दौरा

नगर – देशातील सर्वोच्च तंत्रज्ञान संस्था असलेल्या भारतीय तंत्रज्ञान संस्था (आयआयटी बॉम्बे) येथे 'श्री सांदिपनी अकॅडमी' च्या वतीने एका विशेष शैक्षणिक भेटीचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांच्या भविष्याला नवी दिशा देणारा हा दौरा संस्थेचे संचालक डॉ. के. बालराजु यांच्या मौल्यवान मार्गदर्शनाखाली, सहसंचालक नानासाहेब बारहाते यांच्या अध्यक्षतेखाली आणि सहसंचालक राहुल गुजराल यांच्या खंबीर नेतृत्वाखाली उत्साहात आणि यशस्वीरीत्या झाला. या दौऱ्यादरम्यान विद्यार्थ्यांनी आयआयटीमधील प्रगत प्रयोगशाळा, स्टार्टअप केंद्रांना भेटी दिल्या. या भेटीचा मुख्य उद्देश ग्रामीण व निमशहरी भागातील विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाच्या शिक्षणाची ओळख करून देणे हा होता.

यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सहसंचालक राहुल गुजराल म्हणाले की, केवळ स्वप्न पाहणे पुरेसे नाही, तर ते पूर्ण करण्यासाठी योग्य दिशा आणि कठोर परिश्रमांची जोड आवश्यक असते. आयआयटी मुंबईतील हे वातावरण पाहून विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची आवड निर्माण झाली आहे आणि यातूनच उद्याचे महान संशोधक आणि इंजिनिअर्स घडतील असा विश्वास आम्हाला वाटतो.

संस्थेचे संचालक डॉ. के. बालराजु यांच्या दूरदृष्टीमुळे आणि नानासाहेब बारहाते यांच्या नियोजनामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष आयआयटीच्या प्राध्यापकांशी संवाद साधण्याची संधी मिळाली. विद्यार्थ्यांनी यावेळी तंत्रज्ञानातील नवनवीन बदलांची माहिती जाणून घेतली.

हा दौरा यशस्वी करण्यासाठी अॅकॅडमीच्या शिक्षक आणि कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# पोटनिवडणूक शांततेत पार पाडण्यासाठी कायदा – सुव्यवस्था अबाधित ठेवावी

## जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया



नगर – राहुरी विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, पारदर्शक आणि निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी परस्पर समन्वयाने काम करावे. तसेच संपूर्ण मतदारसंघात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहील, यासाठी विशेष दक्षता घ्यावी, अशा सूचना जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिल्या.

राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आयोजित कायदा व सुव्यवस्था आढावा बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते, उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील, उपजिल्हा निवडणूक अधिकारी दत्तात्रय कवितके यांच्यासह संबंधित पोलीस व विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले की, पोटनिवडणुकीच्या कामकाजासाठी नियुक्त सर्व अधिकाऱ्यांनी योग्य समन्वय राखत निवडणूक आयोगाच्या सर्व मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन करावे आणि आपली जबाबदारी प्रभावीपणे पार पाडावी.

निवडणूक काळात कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पुरेशा प्रमाणात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात यावा. मतदान प्रक्रिया पूर्णपणे शांततेत पार पडेल, यासाठी प्रशासनाने काटेकोर नियोजन करावे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

महसूल व निवडणूक विभागातील अधिकाऱ्यांनी संवेदनशील व अतिसंवेदनशील मतदान केंद्रांवर विशेष लक्ष ठेवावे. संबंधित भागांत गस्त वाढवून नाकाबंदी प्रभावीपणे राबवावी आणि संशयास्पद हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवावे, असेही त्यांनी सांगितले.

मतदान पथके थेट मतदान केंद्रांवर पोहोचणार असून क्षेत्रीय अधिकाऱ्यांमार्फत मतदान यंत्रे केंद्रांवर पोहोचवली जाणार आहेत. या यंत्रांसोबत आवश्यक पोलीस बंदोबस्त देऊन ती विहित वेळेत मतदान केंद्रांवर पोहोचतील, यासाठी नियोजन करावे, अशा सूचनाही जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या.

# राहुरी मतदार संघामध्ये मनाई आदेश

नगर – २२३ राहुरी विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होऊन निवडणूक प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. या निवडणुकीसाठी २३ एप्रिल रोजी मतदान तर ४ मे रोजी मतमोजणी होणार आहे. कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३६ व ३३ (१) (ओ) नुसार मतदारसंघात कोणत्याही व्यक्तीस गैरकृत्य करण्यास ४ मे पर्यंत मनाई करणारे आदेश जारी केले आहेत. आदेशानुसार मतदारसंघामध्ये कोणत्याही व्यक्तीस रस्त्यावरील किंवा रस्त्याने जाणाऱ्या मिरवणुकीतील किंवा जमावातील लोकांनी गैरशिस्त वर्तन करण्यास मनाई करण्यात आली आहे.

कोणत्याही मिरवणुका, रॅली, सभा ठरविलेल्या मार्गाव्यतिरिक्त नेण्यास तसेच दिलेल्या ठिकाणाव्यतिरिक्त आणि वेळेव्यतिरिक्त इतर मार्गाने नेण्यास व वेळेचे उल्लंघन करण्यास मनाई आहे. सर्व मिरवणुकीच्या व जमावाच्या प्रसंगी आणि प्रार्थनास्थळांच्या आसपास प्रार्थनेच्या वेळी कोणत्याही रस्त्यावरील किंवा सार्वजनिक जागी लोकांनी एकत्र जमण्याच्या ठिकाणी गर्दी करण्यास किंवा अडथळा निर्माण करण्यास मनाई करण्यात आली आहे.

सर्व रस्त्यांवर, रस्त्यामध्ये, घाटात, घाटावर, सर्व धक्क्यांवर किंवा धक्क्या मध्ये, जत्रा, देवालय, मशीद, दर्गा आणि सार्वजनिक लोकांच्या जाण्या–येण्याच्या जागांमध्ये गोंधळ घालण्यास, बेशिस्तपणे वागण्यास मनाई आहे. कोणत्याही रस्त्यात, रस्त्याजवळ किंवा अनियमित व विनापरवाना सार्वजनिक जागी वाद्ये वाजवण्यास, गाणी म्हणण्यास, ढोल–ताशे वाजवण्यास मनाई करण्यात आली आहे. कोणत्याही सार्वजनिक जागेत किंवा जागेजवळ, कोणत्याही उपाहारगृहात ध्वनिक्षेपकाचा विनापरवाना वापर करण्यास मनाई करण्यात आली आहे.

याबाबत कोणास सवलत अगर परवानगीची आवश्यकता असल्यास २२३–राहुरी विधानसभा मतदारसंघातील पोलीस ठाण्यांच्या प्रभारी अधिकाऱ्यांना अधिकार प्रदान करण्यात आले असल्याचेही नमूद करण्यात आले आहे.

# राहुरी मतदारसंघात १७ व १८ एप्रिल रोजी गृह मतदान

## ज्येष्ठ व दिव्यांग मतदारांसाठी विशेष सुविधा

नगर – राहुरी विधानसभा मतदारसंघात ८५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिक व ४० टक्क्यांपेक्षा जास्त अपंगत्व असलेल्या टपाली मतदानासाठी मान्य मतदारांसाठी १७ व १८ एप्रिल रोजी गृह मतदान प्रक्रियेचे आयोजन करण्यात आले असून, गरज भासल्यास १९ एप्रिल हा दिवस राखीव ठेवण्यात आला आहे. ही प्रक्रिया सकाळी ७ वाजल्यापासून सुरू होणार आहे, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी अनुप यादव यांनी दिली.

निवडणूक प्रक्रियेत सर्वांचा सहभाग वाढवण्यासाठी व शारीरिक अडचणींमुळे मतदान केंद्रावर येणे शक्य नसलेल्या मतदारांना सुलभता निर्माण करून देण्यासाठी ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. ज्या मतदारांनी १२–डी अर्ज भरून या सुविधेची मागणी केली आहे, त्यांनाच गृह मतदानाची सुविधा लागू राहणार आहे.

या प्रक्रियेसाठी नियुक्त प्रत्येक पथकामध्ये दोन मतदान अधिकारी, एक शिपाई, एक सूक्ष्म निरीक्षक, एक पोलीस कर्मचारी व एक व्हिडिओग्राफर यांचा समावेश असणार आहे. संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक व गोपनीय पद्धतीने पार पाडली जाणार असून, नमुना १० भरून उमेदवारांनी नियुक्त केलेले मतदान प्रतिनिधीही यावेळी उपस्थित राहणार आहेत. विहित नोंदवहीतील पात्र मतदारांनी १७ व १८ एप्रिल रोजी आपल्या निवासस्थानी उपस्थित राहून मतदान प्रक्रियेस सहकार्य करावे. पहिल्या भेटीत मतदार घरी उपलब्ध नसल्यास पथक दुसऱ्यांदा भेट देईल, मात्र त्यानंतर मतदानाची संधी उपलब्ध होणार नाही.

# उमेदवारांच्या निवडणूक खर्चाची प्रथम तपासणी

राहुरी विधानसभा मतदारसंघातील उमेदवारांच्या निवडणूक खर्चाची प्रथम तपासणी तहसील कार्यालय, राहुरी येथे झाली. या तपासणी प्रक्रियेत एकूण ७ उमेदवारांच्या प्रतिनिधींनी सहभाग नोंदवून खर्चाची प्रमाणके व तपासणी नोंदवही सादर केली. खर्च पथकाने सर्व कागदपत्रांची बारकाईने तपासणी करून ही प्रक्रिया पूर्ण केली.

यावेळी खर्च निरीक्षक व्ही. कुमार यांनी उमेदवारांच्या प्रतिनिधींनी विचारलेल्या शंकांचे निरसन करून आवश्यक मार्गदर्शन केले. सहायक खर्च निरीक्षक अजय प्रकाश, नोडल अधिकारी (खर्च) शैलेश मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली तपासणी प्रक्रिया सुरळीत पार पडली. याप्रसंगी लेखाधिकारी माणिक नागरे, सहायक लेखाधिकारी संजय आगलावे, पथक प्रमुख (खर्च) आनंद साठे, प्रवीण मुनोत यांच्यासह खर्च पथकातील सदस्य उपस्थित होते.

# महावितरणच्या तंत्रज्ञाला मारहाण प्रकरणी दोघा जणांवर गुन्हा दाखल

नगर – वीजपुरवठा खंडित झाल्याची तक्रार निवारण करण्यासाठी गेलेल्या महावितरणच्या तंत्रज्ञाला लाथाबुक्कीने मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना नगर तालुक्यातील वाळकी येथे घडली आहे. याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात आरोपी पिता–पुत्रावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सोपान कारभारी नवसुपे (रा. मठपिंपरी, ता.नगर) यांनी फिर्याद दिली आहे. नवसुपे हे वाळकी येथे महावितरण कार्यालयात तंत्रज्ञ म्हणून कार्यरत आहेत. वाळकी येथील रहिवासी आरोपी दीपक बाळासाहेब भालसिंग यांनी वीजपुरवठा बंद असल्याची तक्रार महावितरणच्या पोर्टलवर केली होती. या तक्रारीचे निवारण करण्यासाठी नवसुपे हे दीपक भालसिंग यांच्या घरी गेले होते. तेथे त्यांनी वीज मीटरची पाहणी केली असता, मीटरमध्ये 'लूज कॉन्टॅक्ट' असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.

यावेळी नवसुपे यांनी दीपक भालसिंग यांना तुम्ही मीटरमध्ये छेडछाड केली आहे का? अशी विचारणा केली. या विचारणेचा राग आल्याने आरोपी दीपक बाळासाहेब भालसिंग आणि जयेश दीपक भालसिंग या दोघांनी नवसुपे यांना अश्लील भाषेत शिवीगाळ करत लाथाबुक्कीने मारहाण केली. जर पुन्हा या गावात दिसलात, तर तुम्हाला जीवे ठार मारून टाकू, अशी धमकीही यावेळी आरोपींनी दिली. या प्रकारामुळे सरकारी कामात अडथळा निर्माण झाला असून, तंत्रज्ञ नवसुपे यांना त्यांचे कर्तव्य बजावण्यापासून रोखण्यात आले.

या घटनेनंतर सोपान नवसुपे यांनी नगर तालुका पोलीस ठाण्यात धाव घेऊन फिर्याद दिली. त्यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी दीपक भालसिंग आणि जयेश भालसिंग या दोघांविरुद्ध सरकारी कामात अडथळा, मारहाण आणि धमकी दिल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक फौजदार गुंजाळ हे करत आहेत.

